बुधवार, १२ ऑक्टोबर २०२२

# राम प्रहर

◆ वर्ष १५ ◆ अंक ८५
www.ramprahar.com

◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड

## अंतरंग

'पंजाच्या पकडीतील मशाल महाराष्ट्र स्वीकारणार नाही'/२
महाडमध्ये फटाक्यांचे नियमबाह्य स्टॉल? नागरिकांचा विरोध/५
टीम इंडियाने आफ्रिकेविरुद्धची वनडे मालिकाही जिंकली/८

## इथेनॉलवर धावणारी पहिली कार भारतात लॉन्च



**मुंबई** : गेल्या अनेक दिवसांपासून इथेनॉलवर धावणाऱ्या वाहनांची चर्चा होत होती. अखेर मंगळवारी (दि. ११) आघाडीची वाहन उत्पादक कंपनी टोयोटाने देशातील पहिली फ्लेक्स इंधनवर धावणारी कार लॉन्च केली. केंद्रीय परिवहनमंत्री नितीन गडकरी यांच्या उपस्थित ही कार लॉन्च करण्यात आली. या वेळी ना. गडकरी यांनी स्वतः ही कार चालवली. या कार्यक्रमाला केंद्रीय पर्यावरणमंत्री भूपेंद्र यादवही उपस्थित होते. परदेशातील इंधन दरवाढीमुळे देशात पेट्रोल आणि डिझेलच्या दरात सातत्याने वाढ झाल्यानंतर या कारकडे पर्याय म्हणून पाहिले जात आहे. ही गाडी पर्यावरणासाठीसुद्धा फायदेशीर ठरणार आहे. शिवाय ती स्वस्त आणि किफायतशीर असणार असल्याचे सांगितले जाते. त्यामुळे ही कार बाजारात आल्यानंतर लोकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

# मुख्यमंत्री शिंदेंना ढाल-तलवार

## बाळासाहेबांची शिवसेना पक्षाला निवडणूक आयोगाने दिले चिन्ह

**मुंबई : प्रतिनिधी**

केंद्रीय निवडणूक आयोगाकडून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या बाळासाहेबांची शिवसेना पक्षाला ढाल-तलवार हे चिन्ह देण्यात आले आहे. निवडणूक आयोगाने सोमवारी ठाकरे गटाला शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे नाव व मशाल चिन्ह दिले होते, तर शिंदे गटाला नव्याने तीन चिन्हे पाठविण्यास सांगितले होते. मुख्यमंत्री शिंदे यांच्याकडून मंगळवारी (दि. ११) चिन्हे पाठविल्यानंतर त्यातून ढाल-तलवार चिन्ह त्यांना देण्यात आले आहे.

मुंबईतील अंधेरी पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेना पक्षनाव आणि चिन्ह गोठविल्यानंतर निवडणूक आयोगाने सोमवारी दुपारी १ वाजेपर्यंत पक्ष व चिन्हांचे तीन पर्याय सादर करण्यास सांगितले होते, मात्र दोन्ही गटांकडून सादर झालेल्या नाव आणि चिन्हांमध्ये साधर्म्य असल्याचे समोर आले. त्यामुळे आयोगाकडून कोणता निर्णय घेतला



जाईल याकडे लक्ष लागले होते. अखेर निवडणूक आयोगाने उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदे गटासाठी नव्या नावांचे वाटप केले. त्यानुसार उद्धव ठाकरे गटाला शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे हे नाव मिळाले, तर शिंदे गटाच्या बाळासाहेबांची शिवसेना या पर्यायी नावाला मान्यता देण्यात आली होती.

यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या बाळासाहेबांची शिवसेना पक्षाकडून ढाल-तलवार, तळपता सूर्य व पिंपळाचे झाड असे पर्याय देण्यात आले होते. त्यापैकी ढाल-तलवार चिन्हाला निवडणूक आयोगाने मान्यता दिली आहे.

### छत्रपती शिवराय आणि मावळ्यांची ही निशाणी : मुख्यमंत्री

बाळासाहेबांची शिवसेना या आपल्या पक्षाला ढाल-तलवार चिन्ह मिळाल्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. ढाल-तलवार ही छत्रपती शिवरायांची आणि त्यांच्या मावळ्यांची निशाणी आहे. त्यामुळे ती अगोदरच सर्वत्र पोहचलेली आहे, असे मुख्यमंत्र्यांनी म्हटले आहे.

केंद्रीय निवडणूक आयोगाने दिलेला निर्णय आम्हाला मान्य आहे. त्यांनी आम्हाला ढाल-तलवार चिन्ह दिले आहे आणि ही शिवसेनेची जुनीच निशाणी आहे. आपली बाळासाहेबांची शिवसेना असून ही मराठमोळी निशाणी आहे. त्यामळे आता परफेक्ट काम झालेले आहे, असेही मुख्यमंत्री शिंदे प्रसारमाध्यमांशी बोलताना म्हणाले.

# उरण स्फोटातील जखमी तिसऱ्या कामगाराचाही मृत्यू

### ग्रामस्थांमध्ये हळहळ

**उरण : प्रतिनिधी, बातमीदार**

उरण तालुक्यातील बोकडविरा येथील वायू विद्युत निर्मिती केंद्रात ९ ऑक्टोबर रोजी झालेल्या बॉयलरच्या भीषण स्फोटात सहाय्यक अभियंत्यासह तीन कामगार ८० ते ८५ टक्के भाजले होते. त्यातील विवेक धुमाळे यांचा जागीच मृत्यू झाला. बोकडविरा येथील दुसरा कामगार विष्णू पाटील यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला, तर डोंगरी येथील रहिवासी असलेला तिसरा कामगार कुंदन पाटील तीन दिवस मृत्यूशी झुंज देत असताना मंगळवारी (दि. ११) त्यांचीही प्राणज्योत मालवली.

वायू विद्युत केंद्राच्या दुर्घटनेत एका सहाय्यक अभियंत्यासह तीन कामगारांना जीवाला मुकावे लागले आहे. त्यामुळे हळहळ आणि संतापही व्यक्त होत आहे. कामगार विष्णू पाटील यांचा मृतदेह सोमवारी (दि. १०) रात्री वायू विद्युत निर्मिती केंद्राच्या प्रवेशद्वाजवळ आणण्यात आला होता.

काही वर्षांपूर्वी राज्य वीज निर्मिती गॅस टर्बाइनच्या याच प्रकल्पात रात्रीच्या वेळी अशाच



प्रकारे बॉयलरचा स्फोट झाला होता व त्या वेळी येथील प्रचंड मोठी विद्युत मोटार २५ फुटांपेक्षाही लांब उडाली होती, तर २५ ऑक्टोबर २००८ रोजी शॉर्टसर्किटमुळे झालेल्या स्पार्किंगमुळे दुर्घटना घडली होती. यामध्ये तीन कर्मचारी होरपळले होते. त्यापैकी एकाचा मृत्यू झाला होता.

आता बॉयलर स्फोटात तीनही कामगारांचा मृत्यू झाला आहे. त्यामुळे सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. सुरक्षाविषयक बाबींचा गांभीर्याने विचार करण्याची मागणी कामगारवर्ग तसेच परिसरातील ग्रामस्थांमधून होत आहे.



(छाया : सुबोध ठाकूर)

**पनवेल : परतीच्या पावसाचा जोर कायम असून मंगळवारी ढगांचा गडगडाट व विजेच्या कडकडाटासह पावसाने हजेरी लावली. या वेळी भर दुपारीच अंधार पडला होता.**

# उद्धव ठाकरेंना धक्का; तीन उपजिल्हाप्रमुखांचा शिंदे गटात प्रवेश



**मुंबई** : उद्धव ठाकरे यांना निवडणूक आयोगाने नवे पक्षचिन्ह आणि नाव बहाल केल्यानंतर पहिला धक्का बसला आहे. ठाकरे गटातील तीन उपजिल्हाप्रमुखांनी शिंदे गटात प्रवेश केला आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील शिवसेनेच्या उपजिल्हाप्रमुखांनी शिंदे गटाची वाट धरल्यामुळे ठाकरेंच्या शिवसेनेला सिंधुदुर्गात खिंडार पडले आहे.

सिंधुदुर्ग येथील सचिन देसाई, सुनील डुबळे आणि बाळा दळवी यांनी मंगळवारी (दि. ११) मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत बाळासाहेबांची शिवसेना पक्षात प्रवेश केला. ठाकरे यांना नवे निवडणूक चिन्ह दिल्यानंतर दुसऱ्याच दिवशी त्यांना हा धक्का बसला आहे.

## निवडक

### सरन्यायाधीश पदासाठी चंद्रचूड यांची शिफारस

**नवी दिल्ली** : देशाचे सरन्यायाधीश उदय लळीत यांनी पुढील सरन्यायाधीश म्हणून न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड यांच्या नावाची शिफारस केली आहे. त्यामुळे लळीत यांच्यानंतर सरन्यायाधीशपदावर आणखी एक मराठी व्यक्ती विराजमान होणार आहे. लळीत हे ८ नोव्हेंबरला सरन्यायाधीश पदावरून निवृत्त होत आहेत. त्यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या सर्व न्यायाधीशांच्या उपस्थितीत चंद्रचूड यांच्या नावाची शिफारस करणारे पत्र मंगळवारी (दि. ११) केंद्र सरकारला पाठविले.

### सपा नेते मुलायमसिंह यादव पंचत्वात विलीन

**लखनऊ** : समाजवादी पार्टीचे ज्येष्ठ नेते आणि उत्तर प्रदेशचे माजी मुख्यमंत्री मुलायमसिंह यादव यांच्यावर मंगळवारी (दि. ११) अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांचा मुलगा आणि यूपीचे माजी मुख्यमंत्री अखिलेश यांनी सैफई येथील मैदानावर मुलायमसिंहांच्या पार्थिवाला मुखाग्नी दिला. तत्पूर्वी विविध पक्षांचे नेते, मंत्री व अन्य मान्यवरांनी सपाच्या 'नेताजीं'चे अंतिम दर्शन घेत श्रद्धांजली वाहिली.

### पालघर साधू हत्याकांड प्रकरण

# महाराष्ट्र सरकार तपास सीबीआयकडे सोपविणार



**मुंबई : प्रतिनिधी**

पालघर साधू हत्याकांड प्रकरणात महत्त्वाची माहिती समोर आली आहे. या हत्याकांडाचा तपास आता सीबीआयकडे वर्ग करण्यास महाराष्ट्र सरकारने तयारी दर्शविली आहे. महाराष्ट्र सरकारने तपास हस्तांतरणाला आपली हरकत नसल्याचे सांगितले असून तसे शपथपत्रही सर्वोच्च न्यायालयात सादर केले आहे.

१६ एप्रिलच्या २०२२ रात्री सुरतकडे निघालेल्या दोन साधू व त्यांच्या चालकांची गडचिंचले येथे जमावाकडून निर्घृणपणे हत्या करण्यात आली होती. आरोपींविरोधात ठोस पुरावे गोळा करण्यासाठी सीआयडीने ८०८ संशयितांची चौकशी केली होती तसेच १०८ साक्षीदारांचा जबाब नोंदविला होता. या प्रकरणी सुमारे २०० लोकांना अटक करण्यात आली होती. यातील ११ आरोपी अल्पवयीन होते. त्याचबरोबर या हत्या प्रकरणात पाच पोलिसांचे निलंबन, तर ३०हून पोलीस अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या होत्या.

या प्रकरणात पुढे नोव्हेंबर २०२२मध्ये अटक करण्यात आलेल्या ५८ जणांना जामीन मंजूर करण्यात आला, तर डिसेंबर महिन्यात यातील ४७ आरोपींना ठाणे जिल्हा सत्र न्यायालयाने प्रत्येकी १५ हजार रुपयांच्या जातमुचलक्यावर जामीन मंजूर केला होता.

# मनसे आगामी निवडणुका स्वबळावर लढणार

### राज ठाकरे यांचा निर्णय

**मुंबई : प्रतिनिधी**

आगामी निवडणुका स्वबळावर लढविण्याचा निर्णय महाराष्ट्र नवनिर्माण सेनचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी घेतला आहे. मनसे पदाधिकाऱ्यांच्या मंगळवारी (दि. ११) रंगशारदा येथे झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

या बैठकीत राज ठाकरे यांनी मार्गदर्शन केले. या वेळी त्यांनी आगामी निवडणुका स्वबळावर लढण्यासाठी सज्ज व्हा आणि कामाल लागा, असे आदेश मनसैनिकांना दिले.

या वेळी राज ठाकरेंनी राज्यातील सध्याच्या राजकीय परिस्थितीवर आपले मत व्यक्त केले तसेच लोकांमध्ये मिसळा, मनसेचा प्रचार करा, अशी सूचना पदाधिकाऱ्यांना केली. सत्ता आली तर मी तुम्हालाच सत्तेवर बसवेन. मी सत्तेत बसणार नाही, असा टोलाही त्यांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव यांना लगावला आहे.






**पनवेल : चिल्ड्रन टेक सेंटर आणि शाहू इन्स्टिट्यूट यांच्या संयुक्त विद्यमाने खांदा कॉलनीतील सीकेटी महाविद्यालयात रोबोटिक सेमिनार आयोजित करण्यात आला होता. या सेमिनारला महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, उपायुक्त सचिन पवार, माजी नगरसेवक अनिल भगत, शाहू इन्स्टिट्यूटचे प्रमुख जयंत भगत प्रमुख मान्यवर म्हणून उपस्थित होते. या वेळी आयोजकांच्या वतीने रोबोटिकसंदर्भात विविध प्रात्यक्षिके सादर करण्यात आली.** (वृत्त पान ३ वर..)

# पंजाच्या पकडीतील मशाल महाराष्ट्र स्वीकारणार नाही

## भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांची खरमरीत टीका



### आमची युती आगामी सर्व निवडणुकांमध्ये विजय मिळवेल

**भारतीय जनता पक्षाची युती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील बाळासाहेबांच्या शिवसेनेशी आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारच्या कामाच्या जोरावर आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात आमची युती आगामी सर्व निवडणुकांमध्ये विजय मिळवेल, असा विश्वास या वेळी भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केला.**

**मुंबई : प्रतिनिधी**

उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्रिपदासाठी हिंदुत्वाचा विचार सोडून काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसचा विचार स्वीकारला. त्यांचे हिंदुत्व बेगडी असल्याचे लोकांनी पाहिले आहे. त्यांनी मशाल घेतली असली तरी ती पंजाने पकडली आहे. राज्यात पंजाची मशाल कोणी स्वीकारणार नाही आणि ही मशाल पेटणारही नाही, अशी खरमरीत टीका भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी मंगळवारी (दि. ११) केली. ते भंडारा येथे पत्रकार परिषदेत बोलत होते.

या पत्रकार परिषदेस भाजप प्रदेश उपाध्यक्ष संजय भेंडे, खासदार सुनील मेंढे, भंडारा जिल्हाध्यक्ष शिवराम गिरिपुंजे, आमदार परिणय फुके आणि प्रदेशाध्यक्षांच्या दौऱ्याचे सहप्रमुख विजय चौधरी उपस्थित होते.

भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, उद्धव ठाकरे शिवसेना केवळ काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या आश्रयामुळे राजकीयदृष्ट्या जिवंत आहे. ज्या नेतृत्वाने हिंदुत्वाचा विचार सोडून काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसचा विचार स्वीकारला त्यांनी मशाल किंवा अन्य कोणतेही चिन्ह घेतले तरी त्यांना राजकीय लाभ होणार नाही. मुख्यमंत्रीपद मिळविण्यासाठी उद्धव ठाकरे यांनी काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसचा विचार स्वीकारत आपल्या पक्षाचे व कार्यकर्त्यांचे प्रचंड नुकसान केले.

शिवसेनेचा पक्ष का फुटला व त्या पक्षातून खासदार, आमदार का बाहेर पडले याचा उद्धव ठाकरे यांनी विचार करावा. त्यांचा पक्ष सांभाळण्याची जबाबदारी त्यांचीच आहे. त्या पक्षातील घडामोडींना भाजप जबाबदार नाही, असे प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांनी स्पष्ट केले.

आपण प्रदेशाध्यक्ष झाल्यापासून प्रत्येक जिल्ह्याचा प्रवास करीत आहोत. भंडारा हा आपला प्रवासाचा १९वा जिल्हा आहे. राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात आपण भाजपाचा संघटनात्मक प्रवास करणार आहोत. भाजपने राज्यातील केंद्र सरकारच्या लाभार्थ्यांशी संपर्क साधून 'धन्यवाद मोदी', अशी लाभार्थ्यांच्या हस्ताक्षरातील पंधरा लाख पत्रे पाठविण्याचा उपक्रम सुरू केला आहे. बूथस्तरावर पक्ष अधिक मजबूत करण्यासाठी काम चालू आहे. प्रत्येक कार्यकर्त्याला २० घरांची जबाबदारी देऊन सरकारच्या योजनांचा लाभ पोहचविण्यासाठी काम करण्यात येत आहे तसेच राज्यभर विविध कार्यकर्ते मोठ्या संख्येने भाजपमध्ये प्रवेश करीत आहेत, असेही बावनकुळे यांनी सांगितले.

# ढाल-तलवार चिन्हाचे पोलादपुरात जोरदार स्वागत

## आमदार भरत गोगावलेंनी व्यक्त केला आनंद

**पोलादपूर : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या बाळासाहेबांची शिवसेना पक्षाला ढाल-तलवार असे निवडणूक चिन्ह मिळाले आहे. याचा आनंद व्यक्त करताना पक्षप्रतोद तथा महाड विधानसभा मतदारसंघाचे आमदार भरत गोगावले यांनी मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील पोलादपूर येथील शिवछत्रपतींच्या अश्वारूढ पुतळ्याला अभिवादन करून फटाक्यांची आतषबाजी केली.

बाळासाहेबांची शिवसेना पक्षाला मिळालेल्या निवडणूक चिन्हाची माहिती जलदगतीने मतदार जनतेला करून देण्यासाठी प्राधान्याने प्रयत्न करणार असल्याचे या वेळी आमदार गोगावले यांनी सांगितले.

योगायोगाने शिवछत्रपतींच्या अश्वारूढ पुतळयाचया चबुतऱ्यावरदेखील एक ढाल व दोन तलवारी हे बाळासाहेबांची शिवसेना पक्षाचे निवडणूक चिन्ह असल्याने आमदार गोगावले यांनी या वेळी त्या चिन्हाकडे अंगुलीनिर्देश करून उपस्थितांचे लक्ष वेधले.



(छाया : शैलेश पालकर)

# 'सीकेटी'त जैविक खत तंत्रज्ञान कार्यशाळा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनीतील चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्टस्, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेज न्यू पनवेल (स्वायत्त) येथे जैविक खत तंत्रज्ञान या विषयावर कार्यशाळा २८ सप्टेंबर ते ८ ऑक्टोबरदरम्यान घेण्यात आली.

प्रमुख पाहुणे निवृत्त प्राध्यापक कॉलेज ऑफ इंजिनियरिंग पुणे, डॉ. महेंद्र रांजेकर आणि संचालक अमेय महेंद्र रांजेकर (ग्रीन व्हायटलस बायोटेक पुणे) उपस्थित होते तसेच प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. बी. डी. आघाव, विज्ञान विद्याशाखा प्रमुख डॉ. जे. एस. ठाकूर, रुसा समन्वयक डॉ. एस. एन. वाजेकर, लेखा व वित्त विभागाचे प्रमुख व इनक्युबेशन इनोव्हेशन सेलचे प्रमुख डॉ. निलेश कोळी, कार्यशाळेचे समन्वयक व सूक्ष्मजीवशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. निलेश वडनेरे आदी उपस्थित होते.

प्राचार्य डॉ. एस. के. पाटील यांनी महाविद्यालयाच्या रौप्य महोत्सव वर्षात सुरू असलेल्या उपक्रमांची माहिती उपस्थितांना दिली. सर्वांगीण विकासासाठी करीत असलेल्या सर्व योजनांचा सखोल आराखडा मांडला. सूक्ष्मजीवशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. निलेश वडनेरे यांनी कार्यक्रमांची रुपरेषा सांगून प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला.

प्रमुख मार्गदर्शक डॉ. महेंद्र रांजेकर व अमेय रांजेकर यांनी विद्यार्थ्यांना जैविक खतांच्या निर्मितीची सखोल प्रक्रिया शिकवली. प्रात्यक्षिकादरम्यान विद्यार्थ्यांनी बायोरीएक्टर हाताळणे तसेच बॉटल फिलिंग, सीलिंग आणि पॅकेजिंग ह्याचे प्रशिक्षण घेतले.

प्रशिक्षणादरम्यान संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे यांनी कार्यशाळेस भेट देऊन विद्यार्थ्यांचे मनोबल वाढविले तसेच इंडियाना युनिव्हर्सिटी युएसए विज्ञान विभागाचे डीन डॉ. जॉन डीटूसा व असोसिएट डीन डॉ. राजीव राजे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. सूत्रसंचालन स्वलेहा आरिफ हिने केले, तर डॉ. अनुभा खरे यांनी आभार मानले.

सूक्ष्मजीवशास्त्र विभागाचे प्रमुख प्रो. निलेश वडनेरे, रूसा समन्वयक डॉ. एस. एन. वाजेकर, लेखा व वित्त विभागाचे प्रमुख व इनक्युबेशन इनोव्हेशन सेलचे प्रमुख डॉ. निलेश कोळी आणि जीवतंत्रज्ञान विभागाच्या प्रमुख डॉ. सीमा कोकितकर, सूक्ष्मजीवशास्त्र विभागाचे प्रा. गणेश साठे, प्रा. नीलिमा तीदार, प्रा. अर्चना गांधारकर, प्रा. अन्वेश वेमुला, प्रा. नमिता गरुडे, डॉ. अनुभा खरे आणि शिक्षकेत्तर कर्मचारीवर्ग यांनी परिश्रम घेतले.

# ज्ञानामृत स्मरणिकेचे 'सीकेटी'त प्रकाशन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयात मंगळवारी (दि. ११) राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) अंतर्गत ज्ञानामृत या स्मरणिकेचे प्रकाशन संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे यांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला विद्यार्थ्यांनी 'हीच आमची प्रार्थना' हे प्रार्थनागीत सादर केले. एनएसएसचे कार्यक्रम अधिकारी विवेक पाटील यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. प्रास्ताविकात त्यांनी आपल्या उपक्रमास संस्थेने केलेल्या सहकार्याबद्दल तसेच दिलेल्या प्रोत्साहनाबद्दल संस्थेचे आभार व्यक्त केले तसेच सर्व शिक्षकांचेही आभार व्यक्त केले.



संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतात एनएसएसचे कार्यक्रम अधिकारी विवेक पाटील, गणेश पाटील व संगीता देशमुख यांचे कौतुक केले. आपण अशा प्रकारचे उपक्रम सातत्याने राबवावेत. त्यासाठी संस्था आपल्याला सर्व प्रकारचे सहकार्य करण्यास तयार आहे. विद्यार्थ्यांचे संपूर्ण व्यक्तिमत्व एनएसएसच्या माध्यमातून घडत असते तसेच आपल्या प्रत्येक विद्यार्थ्याने बाहेरच्या संस्थेत जाऊन तेथील विद्यार्थ्यांशी स्पर्धा करून मिळविलेले यश आपणास अधिक आनंद देईल, असेही मत त्यांनी आपल्या मनोगतात व्यक्त केले.

उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विद्यालयातील विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांना प्रतिनिधिक स्वरूपात स्मरणिकेचे वाटप करण्यात आले.

या प्रकाशन कार्यक्रमासाठी संस्थेचे सहसचिव भाऊसाहेब थोरात, मराठी माध्यमिक विभागाचे प्रभारी मुख्याध्यापक कैलास सत्रे, मराठी पूर्व प्राथमिक व प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक सुभाष मानकर, इंग्रजी पूर्व प्राथमिक आणि प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका नीलिमा शिंदे, इंग्रजी पूर्व प्राथमिक विभागाच्या पर्यवेक्षिका संध्या अय्यर, कला वाणिज्य विभागाचे पर्यवेक्षक अजित सोनवणे, विज्ञान विभागाचे पर्यवेक्षक प्रशांत मोरे तसेच विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारीवृंद या सर्वांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमाचे निवेदन राजेंद्र गांगरे यांनी केले. त्यांच्या आभार प्रदर्शनानेच कार्यक्रमाची सांगता झाली.

# सामाजिक न्याय मंत्रालयाच्या योजनांचा मुंबईत जागर

**मुंबई : प्रतिनिधी**

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि केंद्रीय सामाजिक न्याय व अधिकारिता राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली बुधवारी (दि. १२) दुपारी १ वाजल्यापासून सायंकाळी ५ वाजेपर्यंत मुंबईतील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे केंद्र सरकारच्या तसेच राज्य शासनाच्या सामाजिक न्याय आणि उद्योग मंत्रालयाच्या विविध कल्याणकारी व आर्थिक उन्नतीच्या योजनांची माहिती देऊन जनजागृती करणारे एकदिवसीय शिबिर आयोजित करण्यात आले आहे.

मागासवर्गीय प्रवर्गातील युवकांनी कार्यक्रमाला जरूर उपस्थित राहावे महानगर प्रांतातील मुंबई, ठाणे, पालघर, रायगड जिल्ह्यातील उद्योगाकडे वळू इच्छिणाऱ्या नागरिकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन ना. रामदास आठवले यांनी केले आहे.

# नवी मुंबईतील १००हून अधिक सोसायट्यांना डिजिटल हेल्थ बोर्डचे वितरण



**नवी मुंबई : बातमीदार**

मलेरिया आणि डासांमुळे होणारे आजार कमी करण्यासाठी महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग (एडीएचएस मुंबई), हार्ट फाउंडेशन आणि मेडिकव्हर हॉस्पिटलच्या संयुक्त विद्यमाने नवी मुंबई आणि पनवेलमधील १०० सोसायट्यांना विविध आरोग्य समस्या, आजारांची लक्षणे, घ्यावयाची खबरदारी आदींविषयी माहिती सादर करण्यासाठी डिजिटल हेल्थ बोर्ड वितरित करून एक अनोखा उपक्रम हाती घेतला आहे.

मलेरिया, डेंग्यू आणि इतर आजारांबाबत जागरूकता वाढवण्यासाठी आणि प्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी हा संयुक्त उपक्रम सहाय्यक संचालक आरोग्य सेवा एनव्हीबीडीसीपी मुंबईचे डॉ. बाळासाहेब सोनवणे यांच्या हस्ते घोषणा करून डिजिटल हेल्थ बोर्डचे अनावरण करण्यात आले. या कार्यक्रमास महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाचे प्रभाग अधिकारी (खारघर) जितेंद्र मढवी आणि डॉ. जयकर एलिस, मानद समन्वयक, एडीएचएसएनव्हीबीडीसीपी सार्वजनिक आरोग्य विभाग आणि हार्ट फाउंडेशनचे संस्थापक डॉ. सचिन गडकरी, मेडिकव्हर हॉस्पिटल्सचे केंद्र प्रमुख (नवी मुंबई) आणि अभय जाधव, रिजनल मार्केटींग हेड उपस्थित होते.

आजच्या डिजिटल युगात कोणतीही गोष्ट काही सेकंदात व्हायरल होऊ शकते. त्यामुळे ऑनलाइन काहीही शेअर करताना किंवा पोस्ट करताना सावध राहण्याबाबत या ठिकाणी जागरूक करण्यात आले. एखाद्याने वैद्यकीय माहितीशी संबंधित अस्सल आणि अधिकृत माहिती सर्वांपर्यंत पोहचावी म्हणून एडीएचएस एनव्हीबीडीसीपी, सार्वजनिक आरोग्य विभाग केंद्र सरकार, पनवेल महानगरपालिका, हार्ट फाउंडेशन आणि मेडिकव्हर हॉस्पिटलने सार्वजनिक आरोग्यासाठी एक उत्तम पाऊल उचलले आहे. नवी मुंबईतील १००हून अधिक सोसायट्यांना आरोग्यविषयक समस्या आणि त्याबाबतच्या खबरदारीची माहिती देणारे डिजिटल हेल्थ बोर्ड मिळणार आहेत.

उशिरा निदान झालेल्या कोणत्याही आजारावर उपचार करताना अधिक गुंतागुंत निर्माण होते. त्यामुळे आपण सर्वांनी जागरूक राहणे गरजेचे आहे. अशा आजारावर मात करण्यासाठी आम्ही सर्वच विविध उपक्रमातून जनजागृती करीत असल्याची प्रतिक्रिया मेडिकव्हर हॉस्पिटलचे इंटरनल मेडिसिन एक्स्पर्ट डॉ. निखिल वर्गे यांनी व्यक्त केली.

# 'राज्यातील तासिका तत्त्वावरील अध्यापकांचे मानधन दिवाळीपूर्वी द्यावे'

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील तासिका तत्त्वावर कार्यरत असलेल्या अध्यापकांचे मानधन दिवाळी पूर्वीच करावे, असे निर्देश उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिले आहेत.

राज्यातील तासिका तत्वावर कार्यरत असलेल्या अध्यापकांचे मानधन वेळेत देणे आवश्यक आहे, परंतु काही महाविद्यालये त्यांचे मानधन वेळेत देत नाहीत अशा तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. दिवाळीपूर्वी २१ ऑक्टोबरपर्यंत त्यांच्या थकीत मानधन देण्यात यावे, असे मंत्री पाटील यांनी या वेळी सांगितले.


**सांस्कृतिक कट्टा**

वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल

**संज्या छाया**

(१६ ऑक्टोबर, दुपारी ४.३० वा.)



**MAHATRANSCO**
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E - TENDER NOTICE**

MSETCL INVITES ONLINE bids (e-Tender) from reputed and registered contractors on MAHATRANSCO e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender specification.

| Sr. No. | Tender No. EE/400kV R.S. (O&M) Dn/ NGTN/Tech/ | Description | Estimated cost in lakhs | Sub-mission date |
|---|---|---|---|---|
| 1 | E-Tender-11/ 22-23/RFx No.7000024906 | AMC for various type of bay maintenance work under 400kV RS (O&M) Division, Nagothane under EHV (O&M) Circle, Panvel | Limited to Rs. 25.00 | 18.10.2022 up to 23.59 hrs |

**EMD:** Rs.1% of Estimate cost & **Tender fee:** Rs. 500/- + GST. For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in** **Contact Person:** Mitesh Goyal (Dy. EE) Mob. No. 9461456635 **Email ID: ee7230@mahatransco.in** **Note :** All eligible Suppliers/Contractors are mandated to get enrolled on SRM E Tenders (New) portal of MSETCL.

Sd/-
**EXECUTIVE ENGINEER**
**400kV R.S. (O&M) Dn., Nagothane**



अ‍ॅड वृषाली जितेंद्र वाघमारे

मा. गोडसे सो

**पनवेल येथील दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर पनवेल**

दि. चौ. अर्ज क्र १४१०/२०२२
नि. ७/ड
ने.ता. ५/१२/२०२२

१) श्रीमती. कल्पना सुभाष पाठारी, वय-६० वर्षे, व्यवसाय-गृहिणी
२) श्रीमती. मोना प्रफुल्ल पाठारी, वय-३५ वर्षे, व्यवसाय-गृहिणी
३) कु. सृष्टी प्रफुल्ल पाठारी, वय-१३ वर्षे, व्यवसाय-शिक्षण
४) कु. विघ्नेश प्रफुल्ल पाठारी, वय-९ वर्षे, व्यवसाय-शिक्षण
} अर्जदार

राहणार- सदनिका नं. १०१, पहिला मजला, सिमरन को.ऑप. हौसिंग सोसायटी, प्लॉट नं. ५७, सेक्टर-१०, नविन पनवेल पूर्व, ता. पनवेल, जि. रायगड, ४१०२०६

**विरूध्द**
कोणीही नाही

**जाहीर नोटीस**

वरील अर्जदार **१) श्रीमती. कल्पना सुभाष पाठारी** वय ६० वर्षे, व्यवसाय गृहिणी या **कै. प्रफुल्ल सुभाष पाठारी** यांच्या आई आहेत. **२) श्रीमती. मोना प्रफुल्ल पाठारी,** वय ३५ वर्षे. व्यवसाय - गृहिणी या **कै. प्रफुल्ल सुभाष पाठारी, यांच्या पत्नी आहे. ३) कु. सृष्टी प्रफुल्ल पाठारी,** वय १३ वर्ष, **ही त्यांची मुलगी आहे. ४)कु. विघ्नेश प्रफुल्ल पाठारी** वय ०९वर्षे **हा त्यांचा मुलगा आहे.** राहणार :- **सदनिका नं. १०१,पहिला मजला, सिमरन को. ऑप. हौसिंग सोसायटी, प्लॉट नं. ५७, सेक्टर -१०, नविन पनवेल पूर्व, ता. पनवेल, जि. रायगड** हे सर्व ह्या पत्त्यावर राहत आहे. मयत **कै. प्रफुल्ल सुभाष पाठारी** यांचे पनवेल या ठिकाणी दि. २०/०६/२०२१ रोजी, पनवेल येथे निधन झाले. मयत **कै. प्रफुल्ल सुभाष पाठारी,** यांच्या निधनाची नोंद पनवेल महानगरपालिका यांच्या अधिकाऱ्याची सही व शिक्का आहे. यांनी त्यांच्या मृत्युचा दाखला दिलेला आहे. सदर मयताचे नावे असेले मिळकत खालीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**

| अ.क्र. | पत्ता | किंमत |
|---|---|---|
| १) | सदनिका न १०१,पहिला मजला, सिमरन को-ऑप हौसिंग सोसायटी, प्लॉट नं.५७, सेक्टर - १०, नविन पनवेल पूर्व, ता. पनवेल, जि. रायगड ४१०२०६ | रू. ४९,५०,०००/- |
| २) मौजे-चिखले, ता. पनवेल, जि. रायगड येथील सर्व्हे नं. ४५, हिस्सा नं ४/अ, क्षेत्र ७.५ हे.आर.पॉ. | | |
| ३) मौजे-चिखले, ता. पनवेल, जि. रायगड येथील मिळकत नं./घर नं. २८८, ज्याचे एकूण क्षेत्र ६९७.०२ चौ.मीटर पैकी १ गुंठा | | |

वरील मिळकतीबाबत उक्त अर्जदारांनी वारस दाखला मिळण्याकरीता अर्ज दिला आहे. यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारसदार नव्हे असे कोणास समजाविण्याचे असेल आणि वरील मिळकतीच्या वारस दाखल्याबाबत कोणाचे हक्क, अधिकार अथवा हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास त्याने तशी लेखी हरकत हा जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आंत या मे. कोर्टात सादर करावी. दिलेल्या मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास या अर्जदारास यांचे विनंती प्रमाणे वारस दाखला दिला जाईल व त्यांनतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज दि.११/१०/२२ रोजी माझ्या सहीने व में.कोर्टाचे शिक्यानिशी दिली.

सही/-
क. लिपीक
दि.न्या. व स्तर. पनवेल

सही/-
दि.न्या. व स्तर. पनवेल

# विज्ञानाची धरू कास, देशाचा करू विकास!

## 'सीकेटी'त रोबोटिक प्रशिक्षण सेमिनार



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दिवसेंदिवस तंत्रज्ञानाची होत असलेली प्रगती लक्षात घेता रायगड जिल्ह्यातील मुलांना अत्याधुनिक तंत्रज्ञान अनुभवता यावे यासाठी शाहू इन्स्टिट्यूट, पनवेल व चिल्ड्रेन टेक सेंटर, ठाणे यांच्या वतीने जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनीमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी)आर्ट्स, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स महाविद्यालयात महत्त्वपूर्ण रोबोटिक प्रशिक्षण सेमिनार आयोजित करण्यात आला.

चिल्ड्रेन टेक सेंटरचे संचालक पुरुषोत्तम पाचपांडे यांनी इंटरनेट ऑफ थिंग्स, मशीन लर्निंग, थ्रीडी प्रिंटींग, रोबोटिक्स, स्मार्ट उपकरणे या प्रकारची माहिती दिली.

तंत्रज्ञानाचा झपाट्याने प्रगती होत असताना प्रत्येक क्षेत्रात त्याचा वापर केला जातो. तंत्रज्ञान सोयीचे असले तरी त्याचे प्रशिक्षण नव्या पिढीने शिक्षण तसेच करिअरच्या अनेक नव्या वाटा शोधल्या पाहिजे, असे मत माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी व्यक्त केले.

प्रशिक्षणाची शहराला गरज असून पालकांनी आपल्या पाल्यासाठी रोबोटिक तंत्रज्ञान प्रशिक्षणाचा उपयोग करून घेतल्यास आजचा लहानगा भविष्यातील मोठा शास्त्रज्ञ बनू शकतो, असा विश्वास जयंत भगत यांनी व्यक्त केला.

या सेमिनारमध्ये चिल्ड्रेन टेक सेंटरचे संचालक पुरुषोत्तम पाचपांडे यांनी मार्गदर्शन केले व मेधा गाडगीळ यांनी आभार मानले. या वेळी जनार्दन भगत संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, पनवेल महानगरपालिका उपायुक्त सचिन पवार, माजी नगरसेवक अनिल भगत, व ४० तंत्रज्ञान एज्युकेशन क्षेत्रातील संस्थेचे मान्यवर उपस्थित होते.

# खारघरमध्ये 'महाकाल लोक'चे प्रक्षेपण

**खारघर : रामप्रहर वृत्त**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उज्जैन येथील महाकाल मंदिर भव्य कॉरिडॉरचे मंगळवारी (दि. ११) लोकार्पण केले गेले. या कॉरिडॉरला 'महाकाल लोक' असे नाव देण्यात आले आहे. याचे काम दोन टप्प्यांत केले जात असून, ९०० मीटर परिसरात हे काम करण्यात आले आहे.



उज्जैन येथील महाकाल लोक या कॉरिडॉरच्या लोकार्पणाचा थेट प्रक्षेपणाचा कार्यक्रम खारघर भारतीय जनता पक्षाच्या वतीने परिसरातील नागरिक, भाजप पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्या सोबत अनुभवण्यात आला. खारघर सेक्टर १२ मधील दुर्गा माता मंदिर येथे स्क्रीन लावून थेट प्रक्षेपणाचा व लोकार्पणाचा सोहळ्याचा आनंद सर्वांनी घेतला.

या वेळी भाजप खारघर मंडल अध्यक्ष ब्रिजेश पटेल, सरचिटणीस दीपक शिंदे, उपाध्यक्ष रमेश खडकर, माजी नगरसेवक गुरुनाथ गायकर, आध्यात्मिक सेल संयोजक नवलकुमार मोरे, ज्येष्ठ नागरिक सेल संयोजक नवनीत मारू, उत्तर भारतीय मोर्चा अध्यक्ष विनोद ठाकूर, गिरीश गुप्ता, शैलेंद्र त्रिपाठी, शिक्षक सेल संयोजक प्रो. संदीप रेड्डी, प्रभाग ४ अध्यक्ष वासुदेव पाटील, विनय पाटील, आदेश भोईर, कुणाल संघानी, विजय बागडे, आनंद कांबळे, कमलेश मिश्रा इ. कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.



# बाळासाहेबांची शिवसेना पक्षाच्या पनवेल शहराध्यक्षपदी प्रसाद सोनावणे



## संघटकपदी अभिजित साखरे

**पनवेल : वार्ताहर**

बाळासाहेबांची शिवसेना पक्षाच्या पनवेल शहर अध्यक्षपदी प्रसाद सोनावणे, तर संघटकपदी अभिजित साखरे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे व धर्मवीर आनंद दिघे यांच्या आशीर्वादाने बाळासाहेबांची शिवसेना पक्षाचे मुख्य नेते एकनाथ शिंदे यांच्या आदेशाने पक्षाचे सचिव संजय मोरे यांनी बाळासाहेबांची शिवसेना पनवेल शहर प्रमुखपदी प्रसाद सोनावणे तर संघटकपदी अभिजित साखरे यांची नियुक्ती जाहीर केली आहे. यासंदर्भात नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना मान्यवरांच्या हस्ते नियुक्तीपत्र देण्यात आले.



या वेळी जिल्हा संपर्कप्रमुख रामदास शेवाळे, पनवेल महानगर प्रमुख अ‍ॅड. प्रथमेश चंद्रशेखर सोमण, उपजिल्हाप्रमुख परेश पाटील, तालुकाप्रमुख रुपेश ठोंबरे, युवासेना राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य रूपेश पाटील, उरण उपजिल्हाप्रमुख अतुल भगत उपस्थित होते.

# वीर वाजेकर महाविद्यालयात मुलांमधील कर्करोगावर व्याख्यान

**उरण : वार्ताहर**

राष्ट्रीय सेवा योजना व लायन्स क्लब उरण यांच्या संयुक्त विध्यमाने वीर वाजेकर महाविद्यालयात 'मुलांमधील कर्करोगाविषयी माहितीपर व्याख्यानाचे आयोजन मंगळवारी (दि. ११) करण्यात आले होते.



या वेळी डॉ. साहेबराव ओहोळ यांनी प्रास्ताविक केले. सुधीर सक्सेना यांनी कर्करोग व त्याविषयी घायव्याची काळजी याविषयी आपले मनोगत व्यक्त केले. डॉ. श्वेता बन्सल यांनी कर्करोग कसा होतो, त्याची जेनेटिक कारणे उपाय, काळजी कशी घ्यावी तसेच मोठी माणसे आणि लहान मुले यांच्यातील कर्करोगाविषयी शास्त्रीय माहिती सांगितली. विवेक शर्मा यांनी प्लेटलेट कशा दान केल्या जातात याविषयी माहिती सांगितली.

अमरचंद शर्मा यांनी सांगितले की, लायन्स क्लब हे सामाजिक सेवा करणारी संगठना आहे. समाजातील वेगवेगळ्या घटकात जाऊन काम केले जाते. सदानंद गायकवाड आदी उपस्थित होते. प्राचार्य डॉ. पी. जी. पवार यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले.कार्यक्रमास उपप्राचार्य डॉ. विलास महाले, प्रा. राम गोसावी, प्रा. संतोष देसाई, प्रा.देशमुख, प्रा. राजकुमार कांबळे, प्रा. योगेश कुलकर्णी, प्रा. चारुशीला घरत, प्रा. देवेंद्र कांबळे, डॉ.रत्नमाला जावळे, प्रा. इनामदार, प्रा. बळीराम पवार उपस्थित होते

कार्यक्रमाचे आभार प्रा. श्रीकांत गोतपगार यांनी मानले. प्रा. सी. डी. धिंदळे यांनी सूत्रसंचालन केले. राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक मयूर पाटील, आरती सुरवसे, तन्वी म्हात्रे, महेश वाघमारे, मंदिरा म्हात्रे, आर्यन भगत, दीपेन तांडेल, मोहम्मद अन्सारी, रोहित पाटील यांनी कार्यक्रमाचे व्यवस्थापन केले.



**पनवेल : भाजप युवा कार्यकर्ते विघ्नेश घरत यांना तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. गव्हाण ग्रामपंचायतमध्ये झालेल्या या कार्यक्रमाला सरपंच माई भोईर, उपसरपंच विजय घरत, भाजप तालुका चिटणीस जयवंत देशमुख, ग्रामपंचायत सदस्य योगिता भगत, उषा देशमुख, कामिनी कोळी, सचिन घरत, हेमंत पाटील, रोशन म्हात्रे, अरुण कोळी, पंकज पाटील, शिल्पा कडू, सुनिता घरत, गिरीजाबाई कातकरी, ग्रामविकास अधिकारी एम. डी. पाटील, उलवे नोड महिला मोर्चा उपाध्यक्षा सुजाता पाटील, विजय राठोड, कांबळे गुरुजी, भाऊशेठ पाटील आदी उपस्थित होते.** (छाया : अक्षय शार्दुल)

# गुळसुंदे येथे दिव्यांगांना निर्वाह भत्तावाटप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गुळसुंदे ग्रुप ग्रामपंचायत येथे लाडीवली, आकुळवाडी येथील दिव्यांग व्यक्तींना ग्रामपंचायतीच्या सन २०२२-२३च्या पाच टक्के दिव्यांग निधीन प्रत्येकी चार हजार रुपयांचा निर्वाहभत्ता धनादेश वाटप करण्यात आले.



या वेळी सरपंच हरिश्चंद्र लक्ष्मण बांडे, उपसरपंच शांताराम मालुसरे, ग्रामविकास अधिकारी आर. बी. दासगावकर तसेच ग्रामपंचायत सदस्य मनोज पवार, नूतन पाटील, क्लार्क नंदू नवरंगे आदी उपस्थित होते.

यासोबतच सरपंच हरिश्चंद्र बांडे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यात आल्या. सर्व दिव्यांग लाभार्थ्यांनी तसेच ग्रामस्थांनी ग्रामपंचायतीया या उपक्रमाबद्दल समाधान व आनंद व्यक्त केला.

# चिरनेर आदिवासी आश्रमशाळेत जंतनाशक कार्यक्रम

**उरण : प्रतिनिधी, बातमीदार**

राष्ट्रीय जंतनाशक दिनाचे औचित्य साधून १ ते १९ वर्षे वयोगटातील सर्व मुला मुलींना शाळा व अंगणवाडी केंद्र स्तरावर जंतनाशक गोळी देऊन त्यांचे आरोग्य रक्षण, उत्तम पोषण स्थिती, शिक्षण व जीवनाचा दर्जा उंचावण्याचे उद्दिष्ट शासनामार्फत ठेवण्यात आले आहे. याच अनुषंगाने उरण तालुक्यातील चिरनेर आदिवासीआश्रम शाळा येथे जंतनाशक गोळ्यांचे वाटप करण्यात आले.

या वेळी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुधाकर मोरे, डॉ वंदन पाटील, उरण तालुका आरोग्य अधिकारी राजेंद्र इटकरे, वैद्यकीय अधिकारी डॉ. राजाराम भोसले, डॉ. महेंद्र धादवाड, माजी जिल्हा परिषद सदस्य बाजीराव परदेशी, पब्लिक हेल्थ युनिटचे प्रणिती संकपाळ, आरोग्य सहाय्यक-एस. एस.घाडगे, ए. एच. पाटील, सुनीलराज सैदाणे, सर्व सीएचओ, सर्व आरोग्य सहाय्यक, सर्व शिक्षक वृंद उपस्थित होते. आश्रमशाळेतील मुलांनी सुंदर नाच, गाणी गाऊन सर्वांना मंत्रमुग्ध केले.



## दिवाळीच्या वस्तूंनी बाजारपेठा सजल्या

# पारंपरिक कंदिल, पणत्यांना मागणी

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल परिसरातील बाजारपेठांमध्ये लागला असून दिवाळीच्या वस्तूंनी बाजारपेठ्या सजल्या आहेत. दिवाळी पंधरवड्यावर येऊन ठेपली असताना निरनिराळ्या रंगाच्या पणत्या, रांगोळ्या, आकाश कंदील, फटाके, सुगंधी उटणे, तसेच विद्युत रोषणाईची तोरणे आणि फराळाच्या पदार्थांनी बाजारपेठा सजल्या आहेत. या वस्तूंच्या खरेदीसाठी ग्राहकांनी बाजारपेठेत गर्दी केली आहे.

पारंपरिक मातीच्या पणत्याबरोबर चिनी मातीच्या डिझायनर पणत्या बाजारपेठेत दाखल मातीच्या पणत्याऐवजी पारंपरिक मातीच्या आणि डिझायनर पणत्या घेण्याकडे नागरिकांचा कल अधिक असल्याचे दिसून येत आहे. बाजारात मातीच्या पणत्या २५ ते ३० रुपये डझन तर चिनी मातीच्या पणत्या ४० ते ६० रुपये



डझन आहेत. याशिवाय डेकोरेटिव्ह पणत्याही बाजारात उपलब्ध असून २० रुपयांना दोन या दरात उपलब्ध आहेत. बाजारामध्ये रांगोळ्या काढण्यासाठी विविध डिझाइनच्या गोल आकारच्या जाळी विक्रीसाठी ठेवण्यात आल्या आहेत. यामध्ये मोर, पावलं, देवी-देवता, फुलं, वेली अशा अनेक प्रकारच्या डिझाइन उपलब्ध आहेत. याची किंमत २० ते ४० रुपयांपर्यंत आहे. पारंपरिक रांगोळ्यांची मागणी फारशी कमी झाली नसली तरी गृहिणींकडून रांगोळ्या उपलब्ध असून शुभ चिन्हांच्या स्टिकर्सचा समावेश आहे.

या शिवाय ठिपक्यांच्या रांगोळीच्या डिझाइनचे स्टिकर, संस्कारभारती रांगोळीचे स्टिकर्सही उपलब्ध आहेत. बाजारात पारंपरिक आकाश कंदिलाबरोबर चायना मेड आकाशकंदीलही विक्रीसाठी आले आहेत. मात्र देशी बनावटीचे आकर्षक कंदील घेण्याकडचे लोकांचा कल असल्याचे दिसून येत आहे. प्लास्टिकचे कागदी मिश्र रंगाचे कंदील बाजारात दिसून येतात. प्लास्टिकचे साधे कंदील ५० रुपयांपासून आहे. तर चायना कंदील १५० रुपयांपासून किमती आहेत. फिरकी, चांदणी, झालर आदी प्रकारामध्ये कंदील पाहायला मिळत आहेत.

# पोस्ट ऑफिसच्या कामकाजाची विद्यार्थ्यांनी घेतली माहिती

**पनवेल : प्रतिनिधी**

मामाचे पत्र हा खेळ आपण लहानपणी खेळलो. फोन नव्हते तेव्हा संपर्क साधण्याचे एकमेव साधन म्हणजे पत्र. खेड्या-पाड्यात पोस्टमन पत्र घेऊन आला की त्याचे केव्हढे अप्रूप असायाचे. आजच्या डिजिटल जमान्यात मोबाइलमुळे मुलांना पत्र म्हणजे काय माहीत नाही. आजच्या मुलांना पत्र हा प्रकारच माहीत नसल्याचे मंगळवारी नवीन पनवेलच्या मुख्य पोष्ट ऑफिस मध्ये तेथील कामकाजाची माहिती घेण्यासाठी आलेल्या शाळेतील मुलांच्या भिरभिरणाऱ्या नजरा आणि आपसात सुरू असलेल्या चर्चेतून जाणवत होते.



भारतीय डाक विभागाची स्थापना ९ ऑक्टोबर १८५४ साली झाली. त्याच्या स्थापना दिनानिमित्त डाक विभागा पनवेल पोष्ट ऑफिसच्या कामकाजाची मंगळवारी (दि. ११) विद्यार्थ्यांनी माहिती घेतली. ९ ते १४ ऑक्टोंबर हा पोस्टल आठवडा म्हणून पळण्यात आला आहे. त्यानिमित्त शाळेतील विद्यार्थ्यांना कामकाजाची माहिती मिळावी म्हणून पोस्टात विद्यार्थ्यांच्या भेटीचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी त्यांना पोष्टाबाबत मल्लिका विश्वास, पोस्ट मास्टर अमर सागळे व ऋतीका तेलवणे यांनी माहिती दिली. या मध्ये बचत योजना, रजिस्टर, स्पीड पोस्ट याची माहिती देऊन त्याचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आले. पोस्टाची तिकिटे कशी काढली जातात याची माहिती दिली. पत्र, आंतरदेशीय पत्र, पाकिट व तिकिटे यांचे प्रदर्शन ही नवीन पनवेलच्या मुख्य कार्यालयात मांडण्यात आले आहे.

डी. डी. विसपूते शाळेच्या शिक्षिका अस्मिता ठाकूर यांनी सांगितले की, आम्ही शाळेत अनेक उपक्रम घेत असतो त्यातून विद्यार्थ्यांना माहिती मिळावी हा आमचा उद्देश असतो. पोस्ट ऑफिस दिवस दरवर्षी साजरा केला जातो. मुले त्या विषयावर भाषण करतात पण प्रत्यक्ष तेथील कारभाराची त्यांना माहिती नसते. कारण आता परीक्षेत पेपर व्यतीरिक्त पत्र ही लिहिले जात नाही. त्याविषयी त्यांना यामुळे माहिती मिळावी म्हणून आम्ही ही ट्रीप आयोजित केली होती. आता त्यांना पोस्ट कार्ड दिले आहे त्याच्यावर कसे लिहायचे ते विचारत आहेत. यावर अर्ध्याच पत्ता लिहिला तर ते जाईल का? किती दिवसात जाईल अशा त्यांना शंका आहेत. आज नव्याने त्याची माहिती त्यांना मिळत आहेत. ते त्याचा आनंद घेत आहेत.

माय स्टॅम्प म्हणजे स्वत:चा स्टॅम्प ही नवीन योजना सुरू करण्यात आली आहे. तुम्ही तुमचा किवा तुम्हाला हवा त्याचा फोटो व फूल, प्राणी किवा इतर थीम निवडून तीनशे रुपये फी भरल्यावर तुमचा फोटो असलेली पाच रुपये मूल्य असलेली १२ तिकिटे तुम्हाला मिळतील. त्याचा तुम्ही वापर करू शकता. याबाबत सविस्तर माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली.

## संपादकीय

# चिन्हपुराणाला विराम

कधी नव्हे ते निवडणुकीच्या चिन्हांच्या लढाईलाच निकराचे स्वरूप आलेले जनतेला पहायला मिळाले. शिवसेनेच्या शिंदे गट आणि ठाकरे गटामध्ये निवडणूक निशाणीवरून तुंबळ निशाणेबाजी गेले काही दिवस बघायला मिळाली. कुठल्या गटाला कुठले चिन्ह मिळणार यावरूनच अभूतपूर्व रणकंदन माजले होते. मंगळवारी त्याला पूर्णविराम मिळाल्यामुळे महाराष्ट्रातील मतदारांनी सुस्कारा टाकला असेल.

**येत्या महिन्यात होणाऱ्या अंधेरी पूर्व विधानसभा पोटनिवडणुकीसाठी निवडणूक चिन्हांची लढाई सुरू होती. एका पोटनिवडणुकीपायी महाराष्ट्रभर एवढे महाभारत घडले! शिवसेनेची दोन शकले होऊन आता दोन नवे पक्ष निर्माण झाले आहेत. यातील एका गटाला 'शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे' असे नाव मिळाले असून दुसऱ्या गटास 'बाळासाहेबांची शिवसेना' हे नाव मिळाले आहे. यातील मूळ पक्ष कुठला, निष्ठावंत कोण आणि गद्दार कोण याची उत्तरे जनतेच्या न्यायालयातच मिळू शकतील. तूर्त तरी वेगळ्या चुली मांडून दोन्ही पक्षांना आपापले कर्तृत्व सिद्ध करावे लागणार आहे. ठाकरे गटाला धगधगत्या 'मशाली'चे निवडणूक चिन्ह बहाल करण्यात आले असून शिंदे गटाला 'ढाल तलवार' ही निशाणी प्राप्त झाली आहे. या दोन्ही गटांना निवडणूक आयोगाने विशिष्ट नावे बहाल केली असली तरी जनतेच्या मनात त्यांची ओळख शिवसेनेचे दोन गट अशीच आहे. आगामी निवडणुकीत आपली नवी ओळख सिद्ध करण्यासाठी दोन्ही गटांना शर्थीचे प्रयत्न करावे लागणार आहेत हेच खरे. 'धनुष्यबाण' हे शिवसेनेचे जुने चिन्ह निवडणूक आयोगाने सध्या तरी बासनात गुंडाळून ठेवले आहे. ते पुन्हा कोणाला मिळेल हे सांगता येणार नाही. अंधेरी येथील पोटनिवडणुकीमध्ये बाळासाहेबांच्या शिवसेनेने अद्यापतरी उमेदवार उभा केलेला नाही, परंतु त्यांचा मित्र पक्ष असलेल्या भारतीय जनता पक्षाचा उमेदवार मात्र केव्हाच जाहीर झाला आहे. 'शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे' या पक्षाने दिवंगत आमदार रमेश लटके यांच्या पत्नी ऋतुजा लटके यांची उमेदवारी जाहीर केली असली तरी अन्य पक्षांनी त्यांच्या उमेदवारीबाबत अनेक शंका-कुशंकांचे मोहोळ उभे केलेले दिसते. या निवडणुकीत ठाकरे गटाला भरीव यश मिळाले नाही तर त्या पक्षाची अवस्था अधिकच बिकट होईल हे सांगायला कुणा भविष्यवेत्त्याची गरज नाही. या उलट 'बाळासाहेबांची शिवसेना' मात्र निवडणुकीच्या रिंगणात न उतरूनही विजयी ठरेल असे दिसते. अंधेरी पूर्व पोटनिवडणुकीमध्ये भाजपच्या उमेदवाराचे पारडे राजकीयदृष्ट्या जड मानले जाते. मुख्यमंत्रीपदाची खुर्ची गेल्यानंतर उद्धव ठाकरे यांना सहानुभूतीची मते मिळतील अशी चर्चा समाजमाध्यमांवर पद्धतशीररित्या घडवून आणण्यात येत असली तरी वास्तव तसे नाही. उद्धव ठाकरे यांना मतदारांची सहानुभूती आहे हा निव्वळ भ्रम असल्याची प्रतिक्रिया महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे यांनी व्यक्त केली आणि त्यात निश्चितच तथ्य आहे. मतदारांची सहानुभूती असलीच तर ती मुख्यमंत्री शिंदे यांनाच असायला हवी. मर्सिडीज विरुद्ध रिक्षावाला अशा लढाईत रिक्षावाल्याने बाजी मारली याचे महाराष्ट्रातील मतदारांना निश्चितच कौतुक असेल. मुख्यमंत्री शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना-भाजप युतीचे सरकार गोरगरीबांसाठी झटताना दिसते. हे सामान्य जनतेचे प्रतिनिधित्व करणारे सरकार आहे ही बाब गेल्या शंभर दिवसांमध्ये जनमानसात भिनली आहे. महाविकास आघाडीच्या विरोधात धाडसाने उठाव करणाऱ्या बाळासाहेबांच्या शिवसेनेला 'ढाल-तलवार' ही निशाणी चांगलीच शोभून दिसते. ठाकरे गटाच्या 'मशाली'चा उजेड किती पडणार हे आता लवकरच दिसेल.**

# पनवेल महानगरपालिकेची पाच वर्षपूर्ती



पनवेल महापालिकेचा वर्धापन दिन १ ऑक्टोबर रोजी साजरा झाला. महापालिका स्थापन होऊन आता सहा वर्षे झाली आहेत. पहिल्या निवडणुकीत माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर व आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पक्षाची सत्ता महापालिकेत आली. डॉ. कविता चौतमोल पहिल्या महापौर झाल्या. परेश ठाकूर यांची सभागृह नेतेपदी निवड करण्यात आली. त्यांच्या नेतृत्वाखाली कारभार करताना महापालिका हद्दीतील नव्याने समाविष्ट झालेल्या ग्रामीण भागाचा विकास करताना पनवेलचे शेवटचे टोक असलेल्या धानसर गावापासून कामाला सुरुवात करण्यात आली. देशाचे भवितव्य असलेल्या युवकांना ही प्राधान्य देण्यात आल्याचे दिसून आले. पनवेल शहराचा विकास करताना युवकांसाठी शिक्षण, आरोग्य, सांस्कृतिक आणि क्रिडा सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करण्यात आल्याचे दिसून येत आहे.

**खबरबात**
**नितीन देशमुख**

पनवेल महापालिका ही सगळ्यात तरुण महापालिका आहे. येत्या काळात महापालिकेची भव्य दिव्य इमारत उभारली जाईल, त्याचबरोबर प्रभाग समिती कार्यालय बांधली जातील, आरोग्य सेवांवर भर देत नवी दहा नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे उभारण्यात येणार आहेत. पनवेल महानगरपालिके तर्फे विविध क्षेत्रात विकास कार्यक्रम राबविले जात आहेत. नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र, वॉर्ड ऑफीसेस याच्या बरोबरीने पंतप्रधान आवास योजनेंतर्गत पनवेल महापालिका क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली आहे. या योजनेंतर्गत वाल्मिकी नगर, महाकाली नगर, लक्ष्मी वसाहत, कच्छी मोहल्ला, पटेल मोहल्ला, अशोकबाग, तक्का वसाहत या झोपडपट्टयांचे पुनर्वसन करण्यात येणार आहे. या योजनेमध्ये लाभार्थ्याला ३० चौरस मीटरचे घर मिळणार आहे. प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत पनवेल महानगरपालिकेतील झोपडपट्टी पुनर्वसनाच्या सहा सविस्तर प्रकल्प अहवालास केंद्र व राज्य शासनाची मंजुरी मिळाली आहे.

महात्मा गांधींचे स्वच्छ व निरोगी भारताचे स्वप्न पूर्ण करावे, यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत स्वच्छ भारत अभियानंतर्गत (नागरी) पनवेल महानगरपालिका हद्दीमध्ये एकूण तीन हजार ९४० लाभार्थ्यांना, वैयक्तीक शौचालयांतर्गत लाभ देण्यात आलेला आहे. यावर्षी पनवेल महानगरपालिका क्षेत्रात विविध नाविन्यपूर्ण संकल्पना राबविल्या. स्वच्छता आणि पर्यावरण रक्षण व संवर्धनाचे संदेश प्रसारित करणारी चित्रे भिंतीवर काढण्यात आली होती तसेच तलावांची स्वच्छता करण्यात आली होती. विविध टाकाऊ वस्तूंचे रिड्युस, रियुझ, रिसायकलाचा प्रचार व प्रसार करण्याकरिता प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. महापालिकेच्यावतीने घनकचरा व्यवस्थापन विषयक विविध उपक्रम राबविले गेले. त्यामध्ये लोकसहभागावर भर देण्यात येत आहे. त्यामुळेच केंद्र शासनाच्या स्वच्छ सर्वेक्षण २०२२ स्पर्धेमध्ये १ ते १० लाख लोकसंख्येच्या गटामध्ये राज्य पातळीवर ३४ शहरांमध्ये पनवेल महानगरपालिकेला ५ वा क्रमांक तसेच ३८२ शहरांमध्ये १७ वा क्रमांक प्राप्त झालेला आहे. या बरोबर कचरामुक्त शहरांसाठीचे ३ स्टार व हागणदारी मुक्त शहराचा जऊ++ दर्जा प्राप्त झाला आहे.




माता व बालकांचे आरोग्य सुधारण्याच्या दृष्टीने गर्भवती महिला व स्तनदा मातेला सकस आहार घेण्यास प्रोत्साहित करून त्यांच्या आरोग्यात सुधारणा व्हावी व जन्माला येणाऱ्या नवजात बालकांचे ही आरोग्य सुधारावे या उद्देशाने १ जानेवारी २०१७ पासून देशातील सर्व जिल्ह्यात प्रधानमंत्री मातृत्व वंदना योजना राबविण्यात येत आहे. पनवेल महानगरपालिका क्षेत्रात १० हजार २१२ महिलांना या योजनेचा लाभ देण्यात आला आहे. महापालिका क्षेत्रातील नागरिकांचे आरोग्य तंदुरूस्त रहावे या विचाराने विविध क्रिडा संकुले बांधण्यात येत आहेत. महापालिका क्षेत्रात उद्याने मैदाने विकसित केल्यामुळे येथील शाळा व महाविद्यालयात शिक्षण घेणारे अनेक विद्यार्थी महाविद्यालयीन व राज्य पातळीवर विविध खेळात चमकताना पाहायला मिळतात. नवीन पनवेल येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रिकेट प्रशिक्षण केंद्र उभारण्याचा निर्णय घेण्यात आला. नवीन पनवेल सेक्टर ११मध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रिकेट प्रशिक्षण केंद्र (अकॅडमी) महापालिकेच्या वतीने लवकरच उभारण्यात येणार आहे.

प्रसिध्द किक्रेटपटू दिलीप वेंगसरकर यांच्या संस्थेची निवड यासाठी करण्यात आली आहे. या प्रशिक्षण केंद्रामध्ये प्रशिक्षण देण्यासाठी मे. दिलीप वेंगसरकर फाऊंडेशनशी करार करण्यात आला. यामुळे आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रिकेट खेळाडू तयार व्हावे यासाठी महापालिकेने पुढाकार घेतल्याचे दिसून येत आहे.

श्री. रामशेठ ठाकूर विकास मंडळाच्या माध्यमातून तरूण कलाकारांना प्रोत्साहन देणे, कलेला उत्तेजन देण्यासाठी मल्हार नाट्य करंडक स्पर्धा पनवेल परिसरात जास्तीत जास्त नाट्य संस्कृतीचा प्रचार व्हावा यासाठी सुरू करण्यात आली होती. अखिल भारतीय नाट्य परिषदेचे पनवेल तालुका अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या सूचनेनुसार अटल करंडक राज्यस्तरीय नाट्य स्पर्धा सुरू करण्यात आली. त्यामुळे पनवेलकरांना उत्तम नाटके पाहायला मिळाली. इथल्या कलाकारांना नामवंत कलाकारांचे मार्गदर्शन मिळाले. त्यामुळे अनेकांना चांगली संधि मिळाल्याचे आपल्याला पाहायला मिळत आहे.

पनवेल शहर आटोपशीर आहे त्याचा जर आता योग्य प्रकारे विकास केला तर ही तिसरी मुंबई होईल. भविष्यात मुंबईचा विकास इकडेच होईल यासाठी नियोजन केले पाहिजे. पनवेलजवळ होत असलेले आंतरराष्ट्रीय विमानतळ, ट्रान्स हार्बर लिंक यांसारख्या योजनांमुळे पनवेल हे तिसरी मुंबई ठरेल. आज जी कामे झाली आहेत ती अतिशय चांगली झाली आहेत, प्रशासकीय इमारत, शाळा, तलाव, क्षेत्रीय कार्यालये अशीच कामे येत्या काळात सुरू राहिल्यास पनवेल नावाजलेली महापालिका होईल. स्मार्ट नियोजन केल्यास पनवेल महापालिका नबर वन बनू शकते, असा विश्वास पनवेलमध्ये उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे तो पूर्ण होऊ शकेल.



## बदलते तंत्रज्ञान

### व्हॉट्सॲपवर एकाचवेळी जोडले जाणार १०००हून अधिक लोक




मेसेजिंग प्लॅटफॉर्म व्हॉट्सॲपवर लागोपाठ नवीन फीचर्सचा फायदा युजर्सना मिळत आहे. आता याच्या ग्रुप मेसेजिंग सिस्टमध्ये मोठा बदल केला जात आहे. आधी एकाच ग्रुपमध्ये फक्त २५६ मेंबर्सचा समावेश केला जाऊ शकत होता. आता जास्त संख्या वाढवून ५१२ करण्यात आली आहे.

नवीन रिपोर्टवरून संकेत मिळत आहेत की, ग्रुप मेंबर्सची संख्या पुन्हा एकदा वाढवली जाऊ शकते. आधीच्या तुलनेत ही संख्या दुप्पट होणार आहे. अन्य मेसेजिंग ॲप्सच्या तुलनेत व्हॉट्सॲप ग्रुप्समध्ये कमी मेंबर्सचा समावेश केला जाऊ शकत होता, परंतु नवीन बदलानंतर हे अंतर संपणार आहे.

व्हॉट्सॲपच्या एका ग्रुपमध्ये १०२४ मेंबर्स जोडले जाऊ शकतात. या नवीन लिमिटची टेस्टिंग केली जात आहे. याप्रमाणे एकाचवेळी हजारांहून जास्त लोकांपर्यंत पोहचले जाऊ शकते. व्हॉट्सपअपडेट्सची माहिती देणारा प्लॅटफॉर्म WEBetaInfo च्या माहितीनुसार, मेटाच्या ओनरशीपचे प सध्या ५१२ पार्टीसिपेंट्सच्या ग्रुप लिमिट्समध्ये बदलाची टेस्टिंग केली जात आहे. आता डमिन्सला एका ग्रुपमध्ये १०२४ पर्यंत मेंबर्सचा समावेश करण्याचा ऑप्शन दिला जात आहे.

हे फीचर बीटा युजर्ससोबत टेस्ट केले जात आहे. तसेच निवडक बीटा युजर्सला या फीचरचा फायदा मिळत आहे. प्रायव्हसी देताना व्हॉट्सॲपने आपल्या व्ह्यू वन्स फीचरमध्ये बदल केला आहे. आतापर्यंत व्ह्यू वन्स फीचरसोबत पाठवण्यात आलेले फोटोज किंवा व्हिडिओजच्या स्क्रीनशॉट्ससाठी पाठवले जात होते. आता युजर्स कोणत्याही व्ह्यू वन्स मेसेजचा स्क्रीनशॉट घेऊ शकत नाही. हा ऑप्शन मिळणे बंद झालाय. अडवॉन्स्ड फीचरचा फायदा निवडक युजर्सला देताना व्हॉट्सॲप बिझनेस युजर्ससाठी एक प्रीमियम सेवेचा टेस्टिंग केली जात आहे. प्रीमियम सब्सक्रिप्शन सेवेचा फायदा व्हॉट्सपवर छोट्या मोठ्या बिझनेसमॅनला होईल. एका हिंदी वेबसाईटने याबाबतचे वृत्त दिले आहे.

# चतुरस्त्र लेखिका, कवयित्री शांता शेळके

**निमित्त**



कविता, कथा, कादंबरी, व्यक्तिचित्रे, बालसाहित्य, चित्रपटगीते, समीक्षा, आत्मकथन, अनुवाद अशा विविध साहित्यप्रकारांत लेखन शांता शेळके केलेल्या वृतपत्र, संपादक तथापि कवयित्री आणि गीतकार म्हणून आजच्या पिढीतही विशेष प्रसिद्ध आहेत. त्यांचा जन्म पुणे जिल्ह्यातील इंदापूरचा. पुण्याच्या हुजूरपागा शाळेतून शालेय शिक्षण घेतल्यानंतर पुण्यातच सर परशुरामभाऊ महाविद्यालयात पुढील शिक्षण घेतले. एम.ए.च्या परीक्षेत मराठी हा विषय घेऊन तात्यासाहेब केळकर सुवर्णपदक त्यांनी मिळविले. त्यानंतर मुंबई येथे अल्पकाळ आचार्य अत्रे यांच्या नवयुग साप्ताहिकात नोकरी केली. पुढे नागपूर आणि मुंबई येथील महाविद्यालयांतून मराठीचे अध्यापन केले.

बालसाहित्याच्या जगातही त्यांची कामगिरी उल्लेखनीय आहे. अनेक नाटके, ध्वनी मुद्रिका, चित्रपटांसाठी त्यांनी विपुल गीतलेखन केले. 'तोच चंद्रमा', 'कळ्यांचे दिवस फुलांच्या राती', 'चित्रगीते' ही त्यांची गीतसंकलने प्रसिद्ध आहेत. शांताबाईंनी हिंदी, इंग्रजी, संस्कृत या भाषांमधील साहित्याचे अत्यंत ओघवत्या शैलीत मराठी भाषांतर केलेले आहे. महाकवी कालिदासाचे 'मेघदूत', 'चौघीजणी' त्यांच्या कवितांबरोबरच त्यांचे गद्यलेखन सुद्धा खूप सुंदर आणि मनाला पकडून ठेवणारे आहे. वाचायला घेतले की सोडवत नाही त्यांची पुस्तके. त्यांचे गुलमोहोर, कावेरी, बासरी, इत्यादी कथासंग्रह तर ओढ, धर्म, अशा कादंबऱ्या प्रसिद्ध आहेत.

धूळपाटी नावाचे त्यांचे आत्मचरित्र सुद्धा खूप सुंदर आहे. स्वतःच्या लहानपणाबद्दलच्या त्यातील आठवणी तर आपल्याला हेवा करायला लावतात. तसेच 'पावसाआधीचा पाऊस', 'आनंदाचे झाड', 'वडीलधारी माणसे' हे त्यांचे ललित लेख संग्रह खूपच गाजलेले आहेत. भाषांतर हे शांताबाईंच्या दृष्टीनी फक्त अर्थार्जनाचे साधन नव्हते तर स्वतःच्या भाषाभ्यासातील भर टाकणारेपण होते. त्यातील अत्यंत गाजलेले भाषांतर म्हणजे जपानी हायकुंचे. जपान मधील हा काव्यप्रकार त्यांनी अनुवादित करून मराठी रसिकांच्या पुढे 'पाण्यावरच्या पाकळ्या' नावानी ठेवला आणि तो लोकांना इतका आपला वाटला की लोक आता मराठी हायकू असंच म्हणतात.

जरी अनेक साहित्य प्रकार समर्थपणे हाताळले असले तरी, कविता लेखन हा शांताबाईंच्या विशेष आवडीचा साहित्य प्रकार. 'असेन मी नसेन मी', 'वर्ष', 'रूपसी', 'गोंदण', 'अनोळख', 'जन्माजान्हवी' ही त्यांच्या कविता संग्रहांची काही नावे. 'मुक्ता आणि इतर गोष्टी' हा त्यांचा पहिला कथासंग्रह. 'स्वप्नतरंग' ही त्यांची पहिली कादंबरी; तर 'शब्दांच्या दुनियेत' हा त्यांचा पहिला ललितलेखसंग्रह. त्यांनी उत्तम अनुवादही केले. मागे उभा मंगेश पुढे उभा मंगेश सारखी भक्ती गीते लिहिली. शूर आम्ही सरदार आणि मराठी पाऊल पडते पुढे या सारख्या चित्रपट गाण्यांनी अनेकांना स्फुरण दिलंय. वास्तविक शांता शेळके म्हणजे सगळ्या लहान मुलांच्या लाडक्या आजी. नातवंडांसाठी किलबिल किलबिल पक्षी बोलती, विहीणबाई विहीणबाई अश्या अनेक छान छान कविता, बालगीतं लिहिणाऱ्या.

शांता शेळके यांनी अनेक वर्षे नाटक आणि चित्रपटांच्या सेन्सॉर बोर्डावर काम केले. १९९६ मध्ये आळंदी येथे झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्यसंमेलानाच्या त्या अध्यक्षा होत्या. संतांचे अभंग व ओव्या, तसेच पारंपरिक स्त्रीगीते, लोकगीते इत्यादींचे संस्कार त्यांच्या कवितेतून प्रत्ययास येतात. गीतांचे लावण्या, कोळीगीते असे विविध प्रकार त्यांनी यशस्वीपणे हाताळले आहेत.

**(साभार : मराठीवर्ल्ड)**

**क्लिक...क्लिक...!**



**नवी मुंबई : भारतात ११ ऑक्टोबरपासून सुरू झालेल्या १७ वर्षाखालील महिला फिफा विश्वचषक फुटबॉल स्पर्धा २०२२मध्ये नवी मुंबईतील पहिला सामना आज नेरूळ सेक्टर ७ येथील डॉ. डी. वाय. पाटील स्टेडियममध्ये होत आहे.**

## आरोग्य प्रहर

### ऑफिसचा ताण कमी करण्यासाठी टिप्स



ऑफिसमध्ये कामाच्या दरम्यान तणाव असणे सामान्य आहे. सामान्यतः असे दिसून येते की जेव्हा एखाद्या व्यक्तीचा ताण खूप वाढतो तेव्हा त्याचा परिणाम त्याच्या ऑफिस किंवा कामावरच नाही तर वैयक्तिक आयुष्यावरही दिसून येतो. ऑफिसचा ताण सर्वांनाच असतो. ऑफिसच्या तणावावर मात करण्यासाठी काही सोपे घरगुती उपाय अवलंबवून ताण कमी करू शकता. चला तर मग जाणून घेऊ या.

**तणावाचा मागोवा घेणे** – ऑफिसच्या ताणामुळे मानसिक पातळीवर खूप त्रास होत असेल, तर ऑफिसच्या ताणाचा मागोवा घ्या. डायरी लिहिण्याची सवय असल्यास फक्त विचार डायरीत लिहू नका, तर तणावाखाली असाल तेव्हा तणावाची परिस्थिती लिहिण्याचा प्रयत्न करा. यामुळे न केवळ केवळ स्वत:ची तपासणी करण्याची संधी मिळते,तर ट्रिगर ओळखू शकता. ज्यामुळे तणावाचे व्यवस्थापन करायला सोपे होते.


**निरोगी पर्यायाची निवड करणे** – तणाव कमी करण्यासाठी लोक मिठाई, तळलेले पदार्थ, फास्ट फूड किंवा अल्कोहोलचे सेवन करतात असे सर्वसाधारणपणे दिसून येते. परंतु आपण निरोगी पर्याय निवडणे चांगले आहे. दररोज नियमित व्यायाम करा. हा एक उत्तम स्ट्रेस बस्टर आहे. याशिवाय, योग, संगीत ऐकणे, गेम खेळणे इत्यादी अनेक विविध क्रियाकलापांद्वारे तणाव कमी करण्याचा प्रयत्न करू शकता.

**काम आणि वैयक्तिक जीवन संतुलित करणे** – बहुतेक लोक त्यांच्या कामात इतके व्यस्त होतात की त्यांचे वैयक्तिक जीवन विस्कळीत होऊ लागते आणि म्हणूनच ते स्वतःला खूप तणावाखाली अनुभवतात.असं होऊ नये या साठी वैयक्तिक आणि व्यावसायिक जीवनात सीमारेषा ठरवणे कधीही चांगले. रात्रीच्या जेवणाच्या वेळी फोनला उत्तर न देण्याचा नियम बनवू शकता.

**आरामदायी तंत्राचा वापर करणे** – अतिरिक्त ताण दूर करण्याचा सर्वात प्रभावी मार्ग म्हणजे काही रिलॅक्सींग तंत्रांचा अवलंब करणे. दीर्घ श्वास घेण्याचे व्यायाम केल्याने मानसिकदृष्ट्या अधिक शांतता आणि आनंदी वाटेल. तसेच त्याचा सकारात्मक परिणाम कामावरही दिसून येईल.

# महाडमध्ये फटाक्यांचे नियमबाह्य स्टॉल?

## नागरिकांचा विरोध; पत्रकारांच्या शिष्टमंडळाकडून निवेदन



(संग्रहित छायाचित्र)

**महाड : प्रतिनिधी**

शहरातील मध्यवर्ती परिसर म्हणून ओळखला जाणारा छत्रपती शिवाजी महाराज चौक या भागामध्ये नियमबाह्य फटाक्याचे स्टॉल लावण्याचे प्रयत्न केले जात असून, त्यासाठी प्रशासनाकडून परवानगी मिळावी याकरिता दुकानदार राजकीय दबाव आणण्याचा प्रयत्न करीत असल्याचे समजते. दरम्यान, दाट लोकवस्ती व प्रमुख वाहतुकीच्या परिसरात फटाक्यांचे स्टॉल लावण्यास परवानगी देऊ नये, फटाक्यांचे सर्व स्टॉल काकरतळे येथील भिलारे मैदानावर लावण्यात यावेत, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

काही दिवसांनी सुरू होणाऱ्या दिवाळी उत्सवानिमित्त सर्वत्र फटाक्यांची मोठ्या प्रमाणात विक्री केली जाते. महाड शहरातदेखील अनेक फटाक्याचे स्टॉल लावले जातात. शहरातील प्रमुख रहदारीचा परिसर असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज चौक, लायन्स क्लब बिल्डिंग परिसर, महात्मा गांधी मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, बाजार पेठ या परिसरामध्ये फटाके स्टॉल लावले जातात. हा परिसर रहदारीचा असल्याने येथे फटाक्याचे स्टॉल लावणे धोक्याचे आहे, तसेच छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसरात दुचाकी, चारचाकी वाहनांचे पार्किंग केले जाते. अशा वर्दळीच्या परिसरात फटाक्यांसारखे स्फोटक वस्तूंच्या विक्रीची दुकाने लावणे धोक्याचे आहे.

महाडमधील छत्रपती शिवाजी महाराज मार्ग आणि चौक परिसरात फटाक्यांचे स्टॉल लावले जातात. त्यासाठी प्रशासनाकडून कोणत्याही स्वरूपात लेखी परवानगी दिली जात नाही. परंतु राजकीय दबावतंत्र वापरून छत्रपती शिवाजी महाराज मार्गावर पंधरा ते वीस फटाक्याचे स्टॉल लावले जातात. ज्या ठिकाणी स्टॉल लावले जातात, त्या ठिकाणावरून महावितरणची उच्च दाबवाहिनी जाते.

महाड पत्रकार संघाचे अध्यक्ष निलेश पवार यांच्या नेतृत्वाखाली पत्रकारांच्या शिष्टमंडळाने नगरपालिकेचे प्रशासक रोडगे यांची भेट घेऊन छत्रपती शिवाजी महाराज चौकात फटाके स्टॉल लावण्यास परवानगी देऊ नये, अशी मागणी केली आहे. त्याचप्रमाणे महाड शहर पोलीस ठाण्याचे निरीक्षक खोपडे यांची भेट घेऊन फटाके विक्रीचे स्टॉल लावताना योग्य ती खबरदारी प्रशासनाकडून घेण्याची विनंती केली. फटाक्यांचे स्टॉल शहरातील प्रमुख रस्त्यावर न लावता भिलारे मैदान या सुरक्षित ठिकाणी लावण्यात यावेत, अशी मागणी या वेळी करण्यात आली.

# किल्ले मानगड अभ्यास मोहिमेस दुर्गप्रेमींचा उत्स्फूर्त प्रतिसाद





**माणगाव : प्रतिनिधी**

हिंदवी स्वराज्याची राजधानी रायगडचा उपदुर्ग अशी ओळख असलेल्या मानगडाचा सविस्तर अभ्यास आणि माहिती जाणून घेण्यासाठी दुर्गवीर प्रतिष्ठान संस्थेच्या वतीने रविवारी (दि. ९) अभ्यास मोहीम घेण्यात आली होती. या मोहिमेस दुर्ग प्रेमींचा चांगला प्रतिसाद लाभला.

मानगडावरील शिवकालीन वास्तू, पाण्याचे टाके, सातवाहन काळातील लेणी, सदर आणि गडाचा लष्करी अभ्यास करण्यासाठी मुंबईतील २४ जणांनी या मोहिमेत सहभाग घेतला होता. इतिहास अभ्यासक रामजी कदम यांनी पाच तासामध्ये खडानखडा माहिती देत गडदर्शन घडवले. रायगड किल्ल्यापासून अगदी हाकेच्या अंतरावर असलेल्या मानगडावर पर्यटकांची संख्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे. शहरातील छोटेछोटे समूह ऐतिहासिक स्थळाना भेट देत असतात, मात्र गडकिल्ल्यांचे भौगोलिक, ऐतिहासिक महत्त्व अनेकांना जाणकार मार्गदर्शकाशिवाय कळत नाही. म्हणूनच दुर्गवीर प्रतिष्ठान या संस्थेने पहिलीच मानगड अभ्यास मोहीम आयोजित केली होती.

या अभ्यास मोहिमेचे नियोजन दुर्गवीर मयूर विचारे, अमित जगताप (विक्रोळी) आणि सुमीत जाधव (चिपळूण) यांनी केले होते. या मोहिमेत सहा हिंदी भाषिक शिवप्रेमींनी सहभागी झाले होते. किल्ले मानगडचा दुर्लक्षित, अपरिचित इतिहास अभ्यास मोहिमेतून उलगडल्याबद्दल दुर्गप्रेमींनी समाधान व्यक्त केले.

# ऑनलाइन व्यवहार पडला महाग

## नेरळमध्ये तब्बल सव्वा लाखाची फसवणूक

**कर्जत : प्रतिनिधी**

ऑनलाईन व्यवहार करताना नेरळ गावातील एका व्यक्तीची मोठी आर्थिक फसवणूक झाली आहे. सुरत येथून साड्या मागवण्याचा प्रयत्न या व्यक्तीच्या अंगलट आला असून, या व्यक्तीने दिलेल्या तक्रारीवरून नेरळ पोलीस ठाण्यात सव्वा लाखाची फसवणूक झाल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.





नेरळ राजेंद्रगुरूनगर येथील राज राजू तांबे यांनी आपल्या मित्राच्या मोबाइलवरून श्रीजी इंटरप्रायजेस या कंपनीबरोबर यापूर्वी एकदा साड्या खरेदी-विक्रीचा व्यवहार केला होता. त्यावेळी सुरत येथील कापड व्यापारी कोब्रोज जोसेफ सबेस्तियान याने आपण श्रीजी इंटरप्रायजेस मालक असल्याचे भासविले होते. त्याचेवर विश्वास ठेऊन तांबे यांनी दुसऱ्या वेळेस गुंजन विनोदकुमार सिंग यांच्या मोबाइलवरून कोब्रोज जोसेफ सबेस्तियान याला २५० साड्यांच्या खरेदीची ऑर्डर दिली आणि त्याची सर्व रक्कम एक लाख ३१ हजार २५० रुपये आय मोबाइल ॲपव्दारे टप्प्याटप्प्याने १२ मे ते ६ आक्टोबर २०२२ या कालावधीत पाठवून दिली. मात्र अद्यापपर्यंत साड्या न मिळाल्याने राज राजू तांबे यांनी नेरळ पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

या प्रकरणी नेरळ पोलीस ठाण्यात भादंविक ४२०, ४०६ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास हवालदार पिंगळे करीत आहेत.

# फसवणूक झालेल्या व्यक्तीला रकमेचा परतावा

**माणगाव : प्रतिनिधी**

पोलीस खात्यात भरती करतो असे सांगून विराज विनोद सावंत (रा. आंबेत, ता. म्हसळा) याची दोन लाख रुपयांची फसवणूक झाली होती. माणगाव पोलिसांनी या गुन्ह्याचा तत्परतेने तपास लावून न्यायालयाच्या आदेशाने सदरची रक्कम मंगळवारी (दि.११) सांवत याच्या सुपूर्द केली. आपली रक्कम परत मिळवून दिल्याने फिर्यादी विराज सावंत याने माणगाव पोलिसांचे आभार मानले.

आपली वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांशी चांगली ओळख आहे, तुला पोलीस खात्यात भरती करतो, त्यासाठी तत्परतेने दोन लाख रुपये भरायला लागतील, असे सांगून आरोपी सुजित कृष्णा गोगावले (रा. कामठे, ता. पोलादपूर) याने विराज सावंत याच्याकडे पैशांची मागणी केली. त्यानुसार फिर्यादी सावंत याने आरोपी गोगावले याला १४ सप्टेंबर २०२१ ते २५ ऑगस्ट २०२२ पर्यंत माणगाव येथे दोन लाख रुपये रोख रक्कम दिली. त्यानंतर आरोपीकडून कोणताही प्रतिसाद मिळत नसल्याचे लक्षात आल्यावर सावंत याने २५ ऑगस्ट २०२२ रोजी याबाबतची तक्रार माणगाव पोलीस ठाण्यात दाखल केली. त्यानंतर पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक निरीक्षक सतीश अस्वर



व सहकाऱ्यांनी जलदगतीने या गुन्ह्याचा तपास लावून आरोपी सुजित गोगावले याला ४ सप्टेंबर २०२२ रोजी ताब्यात घेऊन त्याच्याकडून दोन लाख रुपये जप्त केले. सदरची रक्कम न्यायालयाच्या आदेशाने मंगळवारी पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील यांच्या हस्ते विराज सावंत याला परत देण्यात आली. या वेळी सहाय्यक निरीक्षक सतीश अस्वर, महिला पोलीस हवालदार प्रीती ओम्ले, पोलीस शिपाई धोंडिबा गीते, रामनाथ डोईफोडे, अमोल पोंधे आदी उपस्थित होते.

# होमगार्डमुळे मुलाची पालकांशी पुढच्या स्टेशनवर भेट

## नेरळ रेल्वेस्थानकातून शेलू स्थानकात नेऊन सोडले

**कर्जत : प्रतिनिधी**

लोकल पकडण्याच्या नादात एका प्रवाशाचा १३ वर्षांचा मुलगा मध्यरात्री अडीच वाजण्याच्या सुमारास नेरळ स्थानकातील फलाटावरच राहिला. लोकल सुटताच या मुलाने मोठमोठ्याने रडू लागला. ते पाहून फलाटावरील ऑन ड्युटी होमगार्डने मुलाला घेऊन चालती लोकल पकडली व पुढील शेलू रेल्वेस्थानकात मुलाला पालकांच्या स्वाधीन केले. रेल्वेस्थानकातील सीसीटिव्ही कॅमेरे पाहिल्यानंतर त्या होमगार्डच्या कामगिरीचे कौतुक होऊ लागले आहे.





(छाया : विजय मांडे)

गस्तीवर असलेले होमगार्ड अधिकारी राजा नजे तसेच रात्रपाळीकरिता असलेले होमगार्ड अधिकारी राहुल अरुण पाटील, कर्मचारी बबन चिंधू भागीत, अनंता डायरे हे मध्यरात्री नेरळ रेल्वे स्थानकात उपस्थित होते. त्या वेळी माथेरान येथून आलेल्या पाच-सहा प्रवाशांनी मुंबईकडे जाणारी २.४९ लोकल पकडली. त्या वेळी त्या प्रवाशांनी डब्ब्यांची अदलाबदल केली. या गडबडीत त्यांच्याकडील १३ वर्षाचा मुलगा फलाट वरच राहिला. लोकल सुरू झाल्यानंतर होमगार्डना त्या मुलाचे रडणे ऐकू आले. त्यापैकी एक होमगार्ड त्या मुलाला घेऊन चालत्या लोकलमध्ये चढला आणि पुढील प्रवास सुरू झाला. नेरळच्या पुढे असलेल्या शेलू स्थानकात होमगार्डने त्या मुलाला त्याच्या पालकांच्या स्वाधीन केले. त्या वेळी ते प्रवासी आपला मुलगा नेरळ स्थानकात राहिला म्हणून खूप घाबरले होते परंतु शेलू स्थानकात तो मुलगा पाहताच सर्वांनी सुटकेचा निःश्वास सोडला. होमगार्डच्या या कामगिरीबद्दल कौतुक होत आहे.


## पनवेल महानगरपालिका

दीनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान (DAY-NULM)

### जाहिर सुचना

पनवेल महानगरपालिकेच्या राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियानांतर्गत नागरी बेघरांना निवारा उपलब्ध करुन देण्याबाबत शासन निर्णय तसेच केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांमध्ये नमूद करण्यात आले आहे. निवारा हि मानवाची मुलभूत गरज असल्याने अत्यंतिक गरीब - बेघर व्यक्तीला या योजनेद्वारे निवाऱ्याची व्यवस्था करणेत येते. नागरी बेघर निवाऱ्याचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे, नागरी गरीब बेघरांना मुलभूत सोयी व सुविधा उदा. पाणी स्वच्छता, सुरक्षितता, लाईट इ.उपलब्ध करुन निवाऱ्याची सोय करणे.

शासन निर्णय व शासनाच्या अंमलबजावणी व मार्गदर्शक सूचनांनुसार पनवेल महानगरपालिकेला नागरी बेघरांकरिता निवारा उपलब्ध करावयाचा आहे, त्याकरिता ५००० स्क्वे.फु.बांधकाम असलेली जागा पनवेल महानगरपालिका भाडयाने घेणार आहे. सदर जागा ही रेल्वेस्थानक / बसस्थानक जवळ असल्यास तसेच जागेचे भाडे हे न्यूनतम असणाऱ्याला प्राधान्य देण्यात येईल. सबब इच्छुक जागा धारकांनी अटी व शर्तीच्या अधीन राहुन मागणी केल्याप्रमाणे पनवेल महानगरपालिकेस आपले अर्ज जाहिरात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ८ दिवसाच्या आत (१९/१०/२०२२ पर्यंत) सादर करावेत. सदर जाहीर सुचना पनवेल महानगरपालिकेच्या http://www.panvelcorporation या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे.

**अर्ज सादर करण्याच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे राहतील.**

१) अर्जदारांनी आपले अर्ज विहित तारखेपर्यंत सायं ५.०० वाजेपर्यंत पनवेल महानगरपालिकेच्या डे एन यु एल एम विभाग, आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाटयगृह येथे सादर करावेत.
२) दिलेल्या तारखेनंतर आलेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.
३) अर्जासोबत अर्जदारांनी स्वत:च्या मालकीचे जागेच्या कागदपत्रांच्या प्रती व अपेक्षित भाडे सोबत जोडणे आवश्यक आहे.
४) अपूर्ण अर्ज ग्राहय धरले जाणार नाहीत.
५) अर्जदारांनी आपले अर्ज बंद लिफाफ्यामध्ये पूर्ण पत्यासह सादर करणे बंधनकारक आहे.

**प्राप्त अर्जांपैकी एक अथवा सर्व अर्ज कोणतेही कारण न देता मंजुर अथवा नामंजूर करण्याचा हक्क महानगरपालिकेने राखून ठेवला आहे.**

**सही/-**
**(कैलास गावडे),**
**उपायुक्त,**
**पनवेल महानगरपालिका**

**पमपा/DAYNULM/SUSV२४२२/प्र.क्र.०३/८९/२०२२**
**दिनांक १०/१०/२०२२**


# रो रो तिकिट दरात समानता झाल्याने प्रवाशांना दिलासा





(छाया : संजय करडे)

**मुरूड : प्रतिनिधी**

आगरदांडा-दिघी या एकाच जलमार्गावर मार्गावर चालणाऱ्या दोन फेरी बोटींच्या दरात मार्च २०२१ पासून असलेली तफावत दूर झाल्याने प्रवाशांतून समाधान व्यक्त होत आहे. दिघी जलवाहतूक सोसायटी आणि सुवर्णदुर्ग शिपींग कार्पोरेशन यांच्यातर्फे आगरदांडा ते दिघी रो-रो सेवा पुरविली जाते. रो-रो सेवा देणाऱ्या बोटी आणि अंतर सारखेच असतानादेखील दोन्ही सेवांच्या तिकीट दरात मात्र मोठी तफावत होती. सुवर्णदुर्ग शिपींग कार्पोरेशनची फेरी बोट ५० रु. जादा आकारणी करत होती. गेले दिड वर्ष चाललेल्या या लुटीकडे मेरीटाईम बोर्ड दुर्लक्ष करत होते. त्यामुळे प्रवासी त्रस्त झाले होते. याबाबत वृत्त 'दै. रामप्रहर' मध्येही प्रसिध्द झाले होते. प्रवाशांनीही तिकीट दर समान करण्याची मागणी केली होती.त्याची दखल घेत मेरीटाइम बोर्डाने दोन्ही रो रो सेवेचे तिकीट दर समान केले आहेत. त्यामुळे प्रवाशांना दिलासा मिळाला आहे.

> **आगरदांडा-दिघी रो-रो सेवेचे तिकीट दर समान करण्याचे पत्र मुंबईतील मुख्य कार्यालयाकडून शुक्रवारी (दि. ८) प्राप्त होताच आम्ही तातडीने अंमलबजावणीसुद्धा केली आहे. तिकीट दर समान झाल्याने प्रवासीवर्गाला दिलासा मिळणार आहे.**
>
> **-यशोधन कुलकर्णी, बंदर निरीक्षक, मेरीटाइम बोर्ड, आगरदांडा**


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत **श्री. गजानन सिताराम कदम** यांच्याकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे - कोयनावेळे, तालुका - पनवेल, जिल्हा - रायगड.**

| भुमापन नं. | हिस्सा नं | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| ३२ | ८ | ०-७०-८०<br>पो.ख. ०-१७-७० | ५.१२ |

वरील वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापूर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून **१४** दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहीत खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरून सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**पनवेल.**
**दि. ११/१०/२०२२.**

**सही/-**
**ॲड. प्रशांत अशोक भुजबळ**
**कार्यालय :** २, आशादिप अपार्टमेंट, वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ, अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल
मो. क्र. ९९३०३६९८६१



## पनवेल महानगरपालिका
## ता.पनवेल, जि. रायगड

**तात्पुरत्या स्वरूपात फटाके विक्री स्टॉल उभारणेकामी जाहिर सूचना**

पनवेल महानगरपालिकेमार्फत सन २०२२ दिवाळी सणानिमित्त तात्पुरते फटाके विक्रीसाठी खाली नमूद केलेल्या ठिकाणी स्टॉल उभारणीसाठी दिनांक २०/१०/२०२२ ते दिनांक २६/१०/२०२२ पर्यंतच्या कालावधीसाठी जागा उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत. सदर जागा मर्यादित ठेवण्यात आल्या आहेत. इच्छुक फटाके विक्री धारकांनी आपल्या लायसन्सची प्रत अर्जासोबत जोडणेची आहे.

सबब, तात्पुरत्या फटाके विक्रीसाठी महानगरपालिकेकडे जागा मिळणेकामी संबंधित इच्छुकांनी दिनांक १७/१०/२०२२ दुपारी ३.०० पर्यंत महानगरपालिका कार्यालयात कार्यालयीन वेळेत आपले अर्ज सादर करावेत.

**जागेचे ठिकाण :-**

| अ.क्र. | नोड | मैदान | सेक्टर | भुखंड क्र. | क्षेत्रफळ (चौ. मी.) |
|---|---|---|---|---|---|
| १ | कळंबोली | प्ले ग्राऊंड | ४E | १६ | ५,५०७,५२ |
| २ | खारघर | प्ले ग्राऊंड | १२ | १२ | ६,३४३.९५ |
| ३ | कामोठे | प्ले ग्राऊंड | ८ | २५ | ४,९७६.८६ |
| ४ | तळोजा | प्ले ग्राऊंड | १० | ११३+ ११४ | ६,६७१.५९ |

**जा. क्र/पमपा/माव्य/२४२२/प्र.क्र.१९/४३२/२०२२**
**दिनांक ११/१०/२०२२**

**सही/-**
**उप आयुक्त**
**पनवेल महानगरपालिका**

# नवी मुंबईत ‘बाळासाहेबांची शिवसेना’चे कार्यालय




**नवी मुंबई : बातमीदार**

उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदे गट या शिवसेनेतील दोन गटांना निवडणूक आयोगाने नवी नावे दिली आहेत. एकनाथ शिंदे यांच्या गटाला बाळासाहेबांची शिवसेना हे नवे नाव देण्यात आलेय. नवी मुंबईत मंगळवारी (दि. ११) याच नावाचे पहिलं पोस्टर झळकलेय. शिंदे गटाच्या पहिल्या शाखेचे नुकतेच उद्घाटन करण्यात आले आहे. शिंदे गटाचे राज्यातील पाहिले कार्यालय नवी मुंबई मध्यवर्ती कार्यालय नेरूळ येथे उघडण्यात आले आहे.

राष्ट्रवादीचे माजी जिल्हाध्यक्ष असद गावडे यांनी काही दिवसांपूर्वी शिंदे गटात प्रवेश केला होता. त्यांनी मंगळवारी नवी मुंबईत मध्यवर्ती कार्यालयाचे उद्घाटन केले. बाळासाहेबांची शिवसेना या नावाने शाखेचे उद्घाटन झाले असून राज्यातील शिंदे गटाच्या नवी मुंबई गटाने बाजी मारली आहे. नेरूळ पश्चिम रेल्वे स्टेशनजवळ हे कार्यालय आहे. पहिल्या मजल्यावर सभागृह तर तळ मजल्यावर अध्यक्ष कार्यालय आणि प्रतिक्षागृह आहे. शिंदे गटाचे उपनेते विजय नाहटा आणि माजी विरोधी पक्षनेते विजय चौगुले यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.

या उद्घाटन समारंभाला कार्यालयाबाहेर पक्षातील नव्या गटाला मिळालेले नाव मोठ्या बॅनरवर झळकवण्यात आलेय. त्यामुळे संपूर्ण मुंबई आणि महाराष्ट्रात या बॅनरची चर्चा आहे. नवी मुंबई मध्यवर्ती कार्यालयात काही काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांचाही शिंदे गटात प्रवेश करण्यात आला. त्यामुळे हे कार्यालय जोरदार चर्चेत आहे.

## उद्घाटनानंतर पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या



### विजय चौगुले अध्यक्षपदी

**कार्यालयाचे उद्घाटन झाल्यानंतर वडार भवन येथे पहिला कार्यक्रम घेत पद वाटप पत्र सुपूर्त करण्यात आले. यात एकनाथ शिंदे यांचे कट्टर समर्थक विजय चौगुले यांच्या गळ्यात नवी मुंबई अध्यक्षपदाची माळ टाकण्यात आली. संपर्क प्रमुख म्हणून किशोर पाटकर तर जगदीश गवते, सुरेश कुलकर्णी, शिवराम पाटील, आकाश मढवी, रोहिदास पाटील, दीपक सिंग, अजित सावंत, सुरेश सकपाळ, आणि विलास भोईर यांची उपजिल्हा प्रमुख म्हणून नेमणूक करण्यात आली. तर उर्वरित दिवाळीपूर्वी करण्यात येईल, अशी माहिती उपनेते विजय नाहटा यांनी दिली आहे.**

# रेल्वेच्या धडकेत महिलेचा मृत्यू

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी परिसरातील गुळसुंदे हद्दीतील आपटा रेल्वे स्टेशनजवळ एका अनोळखी महिलेला रेल्वेची धडक बसून सदर महिला गंभीररीत्या जखमी होऊन मृत्युमुखी पडल्याची घटना घडली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार मध्यरात्री मुंबईकडून गोवाकडे जाणाऱ्या क्रांती एक्स्प्रेसची आपटा गुळसुंदे हद्दीत एका अनोळखी महिलेला धडक बसली. या अपघातात महिलेला गंभीररित्या जखमी होऊन मृत्युमुखी पडली. या घटनेची माहिती रेल्वे सुरक्षा बलाचे सुरक्षा रक्षक नवनाथ भोर यांनी रसायनी पोलिसांना दिली. या वेळी रसायनी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक अश्वनाथ खेडकर यांनी तत्काळ अपघातस्थळी भेट दिली.

मृत्युमुखी पडलेल्या महिलेचे शवविच्छेदन करण्यात आले असून ही महिला तारा येथे राहणारी असून रेणुका उत्तम जोशी (वय ३२) असे तिचे नाव आहे. घटनेबाबत रसायनी पोलिसांनी सीआरपीसी १७४ नुसार गुन्हा दाखल करून घेतला असून रसायनीचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अश्वनाथ खेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक मुल्ला, पोलीस उपनिरीक्षक म्हामुणकर हे या घटनेचा अधिक तपास करीत आहेत.

# पनवेल पालिका क्षेत्रातील पात्र फेरीवाल्यांची यादी प्रसिद्ध

## हरकती व सूचना मांडण्यासाठी २५ ऑक्टोबर अंतिम मुदत

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल पालिका अंतर्गत फेरीवाल्यांना सहाय्य या घटकाचे काम पहिले जाते. या घटकांतर्गत करण्यात सर्वेक्षणात आलेल्या फेरीवाला पात्र ठरलेल्या फेरीवाल्यांची यादी पालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली असून यावर हरकती व सूचना मांडण्यासाठी पालिकेकडून २५ ऑक्टोबरपर्यंत वेळ देण्यात आली आहे.

पनवेल पालिका क्षेत्रातील विविध भागात मोठ्या प्रमाणात फेरीवाले व्यवसाय करीत आहेत. फेरीवाल्यांचे पुनर्वसन करण्याची जवाबदारी पालिका प्रशासनावर



येऊन पडली आहे. फेरीवाल्यांची ही समस्या सोडवण्यासाठी व सिडकोने फेरीवाल्यांकरिता राखीव ठेवलेल्या भूखंडावर त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी पालिकेच्या वतीने फेरीवाला समिती स्थापन करण्यात आली असून, पालिका हद्दीतीलफेरीवाल्यांच्या सर्वेक्षणाला सुरुवात करण्यात आली आहे. या सर्वेक्षणान आखून दिलेल्या निकषावर पात्र ठरलेल्या फेरीवाल्यांची यादी पालिकेच्या संकेतस्थळावर २३ सप्टेंबर रोजी प्रसिद्ध झाली आहे. पालिकेने या यादीवर हरकती आणि सूचना मांडण्यासाठी २५ ऑक्टोबरपर्यंत कालावधी देण्यात आल्याची माहिती पालिका अधिकाऱ्यांनी दिली आहे.

जवळपास ५५ भूखंडांचे हस्तांतरण पालिकेकडे झाले आहे तर काही भूखंडांचे हस्तांतरण पालिकेकडे होणे बाकी आहे. पालिकेकडे हस्तांतरित झालेल्या भूखंडावर फेरीवाला धोरणा नुसार पात्र फेरीवल्यांचे पुनर्वसन करण्यात येणार आहे.

# सीकेटी महाविद्यालयात ई-साधनांबद्दल शिक्षण प्रशिक्षण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनीमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज (स्वायत्त)मध्ये राष्ट्रीय उच्चतर शिक्षण अभियानांतर्गत, महाविद्यालयाच्या रौप्य महोत्सवानिमित्त, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष व गणित विभाग यांच्या समन्वयाने गणित, संख्याशास्त्र आणि भौतिकशास्त्र शिकवण्यासाठी उपयोगी असलेल्या ई-साधनांबद्दलची माहिती या विषयावर शिक्षण प्रशिक्षण कार्यक्रमाचे शनिवारी (दि. ८) आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून मायक्रोसॉफ्ट इनोवेशन एजुकेटर एक्स्पर्ट व शिरगाव ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य एस. एन. आत्तार, चांगू काना ठाकूर विद्यालय, इंग्रजी माध्यम, मुख्याध्यापक संतोष चव्हाण तसेच संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे उपस्थित होते. तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के.पाटील, समन्वयक व गणित



विभागाचे प्रमुख डॉ. एस. आय. उन्हाळे, सहसमन्वयक सागर खैरनार, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. बी. डी. आघाव, विज्ञानशाखेच्या प्रमुख डॉ. जे. एस. ठाकूर, रुसा समन्वयक डॉ. एस. एन. वाजेकर आदी उपस्थित होते.

प्राचार्य डॉ. एस. के. पाटील सरांनी महाविद्यालयाच्या रौप्य महोत्सव वर्षात सुरू असलेल्या सर्व उपक्रमांची माहिती उपस्थितांना दिली. महाविद्यालय गेली २५ वर्षे विद्यार्थ्यांना केंद्रबिंदू ठेवून त्याच्या सर्वांगीण विकासासाठी करत असलेल्या सर्व योजनांचा सखोल लेखाजोगा मांडला. गणित विभागाचे प्रमुख डॉ. एस. आय. उन्हाळे यांनी कार्यक्रमांची रुपरेषा सांगून प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला.

संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे यांनी ई-साधने स्विकारून त्याचा अवलंब करणे हि कशी काळाची गरज आहे याबद्दल मार्गदर्शन केले. तसेच प्राचार्य एस.एन. आत्तार यांनी गणित, संख्याशास्त्र आणि भौतिकशास्त्र शिकवण्यासाठी उपयोगी असलेल्या ई-साधनानबद्दल विस्तृत माहिती दिली. जिओजेब्रा या आधुनिक सॉफ्टवेअरचा वापर कसा करावा याबद्दल त्यांनी सर्वांना प्रशिक्षण दिले.

कार्यक्रमाचे प्रथम सत्राचे सूत्रसंचालन राज्यशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. आकाश पाटील यांनी केले, दुसऱ्या सत्राचे सूत्रसंचालन गणित विभागातील प्रा. नेहा पाटील यांनी केले तसेच गणित विभागातील प्रा. मयुरी जोशी यांनी या कार्यक्रमाचे आभार मानले.

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य. डॉ. एस. के. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली समन्वयक व गणित विभागाचे प्रमुख डॉ. एस. आय. उन्हाळे, सहसमन्वयक प्रा. सागर खैरनार, गणित विभागाच्या प्रा. मयुरी जोशी, प्रा. नेहा पाटील, प्रा. नीलिमा घरत, प्रा. अभिजित पवार आणि शिक्षकेत्तर कर्मचारीवर्ग यांनी विशेष परिश्रम घेतले.

कार्यक्रम यशस्वी केल्याबद्दल संस्थेचे चेअरमन माजी खासदार रामशेठ ठाकूर, संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, आमदार प्रशांत ठाकूर यांनी आयोजकांचे कौतुक केले.

# चिरनेर येथे आरोग्य तपासणी शिबिर



**उरण : वार्ताहर**

अभिनव सांस्कृतिक कला क्रीडा मंडळाच्या आयोजनातून, उरण तालुक्यातील चिरनेर या गावात मोफत चुंबक चिकित्सा निसर्गोपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. मंगळवारी ११ ऑक्टोबर रोजी सुरू झालेले हे शिबिर २५ ऑक्टोबरपर्यंत चालणार आहे.

चिरनेर येथील श्रीराम मंदिराच्या सभा मंडपात आयोजित करण्यात आलेल्या या शिबिरासाठी महाराष्ट्र ग्रामीण आरोग्य सेवा संस्था नागपूर तसेच श्रीराम उत्सव कमिटी चिरनेर व ग्रामस्थ मंडळ चिरनेर मधीलपाडा यांचे सहकार्य लाभत आहे. या शिबिरात तज्ञ डॉक्टरांमार्फत रुग्णांची विविध आजारांवर मोफत आरोग्य तपासणी सुरू आहे. सकाळी नऊ ते रात्री नऊ वाजेपर्यंत या शिबिरात रुग्णांची तपासणी केली जात आहे. यात हृदयविकार, मधुमेह, लकवा, सांधे दुखी, दमा, सर्दी, वातविकार, पोटाचे विकार, कंबर दुखी, व नाक, कान, घसा अशा विविध आजारांची तपासणी केली जात आहे. या शिबिराला रुग्णांचा उत्तम प्रतिसाद लाभत आहे, अशी माहिती अभिनव मित्र मंडळाच्या वतीने देण्यात आली.

# आदिवासीपाड्यात घरगुती साहित्याचे वाटप

**खारघर : रामप्रहर वृत्त**

पनवेल क्रिकेट समालोचक असोसिएशनच्या वतीने खारघर धामोळे आदिवासी पाड्यात घरगुती साहित्य आणि शालेय विध्यार्थ्याना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले.

या वेळी माजी नगरसेवक प्रवीण पाटील, हरेश केणी, अध्यक्ष किरण पाटील, उपाध्यक्ष योगेश मढवी, रमेश पाटील, संतोष घरत, महेंद्र पाटील, बाळू भोईर, वैभव भौपी, रोशन पाटील, प्रवीण टेंभे, संतोष तांबोळी, संदीप केणी, भोळेनाथ पाटील, नितेश पाटील, सचिन वास्कर, नितीन म्हात्रे, बाळाराम वास्कर, सोपान पाटील, हेमंत केणी, विजय खारकरे, रुपेश पाटील, जहिर पटेल, जयदास



तेलवणे, प्रभाकर जोशी, परेश ठाकूर, नरेश पाटील, विनोद घरत, मणेश पाटील, संदीप म्हात्रे, सचिन म्हात्रे, बाळाराम पाटीलआदी उपस्थित होते.

रायगड, ठाणे, कल्याण परिसरात खेळल्या जाणाऱ्या क्रिकेट स्पर्धेत समालोचक करणाऱ्या पनवेल क्रिकेट समालोचक असोसिएशन तसेच पीटीसी लाईव्ह युट्युबच्या पदाधिकारी आणि सदस्य मिळून दरवर्षी सामाजिक बांधिलकी म्हणून दरवर्षी पनवेल तालुक्यातील आदिवासी पाड्यात साहित्य वितरण करीत असतात.

यावर्षी खारघर मधील धामोळे आदिवासी पाड्यात ९२ कुटुंबीयांना घरगुती साहित्यवाटप करण्यात आले. तसेच शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य मान्यवरांच्या हस्ते वितरण करण्यात आले.

## वाशीत शनिवारी काव्य संमेलन

**नवी मुंबई : बातमीदार**

साहित्यातून समाज प्रबोधन करण्याचा वसा असलेल्या आगरी साहित्य विकास मंडळ नवी मुंबई च्यावतीने शनिवारी (दि. १५) वाशी येथे भव्य काव्य संमेलनचे आयोजन करण्यात आले असल्याचे मंडळाचे सरचिटणीस मोहन भोईर यांनी सांगितले.

आगरी बोली भाषेला सातासमुद्रापार नेण्याऱ्या आगरी साहित्य विकास मंडळाच्यावतीने साहित्यातून समाज प्रबोधनाचे कार्य केले जात आहे. मंडळाचे सरचिटणीस मोहन भोईर यांच्या मार्गदर्शनाखाली 'मॉरिक्षेस'मध्ये आगरी नाट्य कलाकृती च्या माध्यमातून आगरी बोली भाषा चा प्रचार प्रसार करण्यासाठी प्रयत्न केले जात आहे. वाशी येथील योगविद्या निकेतन, वाशी बस डेपोच्या मागे येथे दुपारी ४ ते ६ दरम्यान, भव्य काव्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले असल्याचे मोहन भोईर यांनी सांगितले.

या वेळी मंडळाचे अध्यक्ष पुंडलिक म्हात्रे, खजिनदार रामनाथ म्हात्रे, कार्याध्यक्ष, चंद्रकांत मढवी आणि सहकार्यध्यक्ष धनंजय गोंधळी आदी कवी उपस्थित राहणार आहेत.

# वंडर्स पार्क लवकरच गजबजणार

## नव्या खेळण्यांसह होणार मेकओव्हर

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नेरूळ येथील वंडर्स पार्क हे नवी नवी मुंबई शहरातील लँडमार्क असून नवी मुंबई शहराबरोबरच उरण, पनवेल, ठाणे मुंबई या परिसरातील शहरातील अबाल वृद्धांचे महत्वपूर्ण प्रेक्षणीय ठिकाण असून कोरोनापूर्वी या ठिकाणी नेहमीच गर्दी पाहायला मिळत होती. परंतु मागील अडीच वर्षापासून वंडर पार्क सर्वांना सामान्यांसाठी बंद आहे, परंतू याच वंडर्स पार्कचे संपूर्ण मेकओव्हर करण्यात येत असून लवकरच हे पार्क खुले करण्यात येणार असल्याची माहिती पालिका प्रशासनाने दिली आहे. त्यामुळे या वर्षाखेरीस वंडर पार्कमधील गजबज पुन्हा अनुभवायला मिळणार आहे.

२०१५ रोजी पालिकेचे हे पार्क सुरू करण्यात आले. त्याठिकाणी असलेली आकर्षक खेळणी, जगातील सात आश्चर्य दाखवणाऱ्या प्रतिकृती यासह ॲम्पीथिएटर याबरोबरच आकर्षक तलाव खेळण्यासाठी असलेली प्रशस्त खेळण्याची जागा यामुळे येथे नेहमीच गर्दी पाहायला मिळत होती. नव्याने वंडर्स पार्कमध्ये म्युझिकल फाऊंटन लेझर शोसहित, ऑडिओ व्हुजअल यंत्रणा नविन बसविणे, तलावांची दुरूस्ती, वॉक वे सुधारणा, नव्याने विविध खेळांच्या साहित्याचे प्रकार बसवणे, खेळण्यांखालील




रबर मॅट बदलणे, सर्व ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरा बसविणे, प्रवेशद्वारावर बायोमॅट्रीक मशीन लावणे, नवीन विद्द्युत दिवे लावणे, उद्द्यानात आकर्षक कारंजे सुधारणा अशी जवळजवळ २१ कोटीपेक्षा अधिकच्या खर्चातून वंडर्स पार्कचे मेकओव्हर अंतिम टप्प्यात आहे.

नेरूळमधील वंडर्स पार्कला नेहमीच मोठी गर्दी पाहायला मिळते. या उद्यानात नवी मुंबईसह ठाणे, खारघर, उरण, पनवेल येथुन टॉय ट्रेन तसेच विविध खेळण्यांची मजा घेण्यासाठी नागरीक येतात, परंतू आता खेळण्यांमध्ये ही वाढ करण्यात आली आहे. त्यामुळे नव्याने सुरू होणाऱ्या वंडर्स पार्कची उत्सुकता सर्वांनाचं लागली आहे. नवी मुंबई शहरात वंडर्स पार्क बरोबरच रॉक गार्डन निसर्ग उद्यान घनसोली पार्क, संवेदना उद्यान अशी अनेक उद्याने नागरिकांना आकर्षित करीत आहे. त्यामुळे दिवाळीनंतर या वर्षाच्या अखेरीस हे पार्क नव्याने सुरुवात करण्याची जोरदार तयारी प्रशासनाने केली आहे.

१५ डिसेंबर २०१५ रोजी वंडर्स पार्क नवी मुंबईकरांसाठी खुले करण्यात आले होते. त्यामध्ये मोठ्या प्रमाणात बदल करण्यात आले असून खेळण्यांसोबतच वंडर्स पार्कला नवा लूक देण्यात आलेला आहे. हे पार्क कोरोनापासून जवळजवळ अडीच वर्ष बंद होते. त्यामुळे प्रशासनाने दिवाळीपर्यंत हे पार्क सुरू करावे अशी मागणी करण्यात आली आहे, अशी माहिती माजी सभागृह नेते रवींद्र इथापे यांनी दिली.

**काम अंतिम टप्प्यात**

**वंडर्स पार्क येथे मोठ्या प्रमाणात बदल करण्यात येत असून खेळण्यांमध्ये ही वाढ करण्यात आली आहे तसेच म्युझिकल शो यांसह या पार्कला अधिक देखणे रूप देण्याचा प्रयत्न करण्यात केला आहे वंडर्स पार्क सर्वसामान्यांसाठी डिसेंबर अखेर खुले करण्यासाठी पालिका प्रयत्नशील आहे येथील काम अंतिम टप्प्यात आले आहे. त्यामुळे सर्वांचे आकर्षण असलेले हे पार्क लवकरात लवकर सुरू करण्याचा प्रशासनाचा प्रयत्न आहे. विद्युत विभागाचे काम अंतिम टप्प्यात आहे, अशी माहिती शहर अभियंता संजय देसाई यांनी दिली.**

# बेलापूरमध्ये नागाची सुटका



**नवी मुंबई : बातमीदार**

बेलापूर रेल्वे स्टेशन कमरशीअल कंपनी लिमिटेडच्या ऑफिसमध्ये उच्चदाब विद्युत रूममध्ये आढळलेल्या नागाची पुनर्वसु संस्थेकडून सुखरूप सुटका करण्यात आली. त्यामुळे कर्मचाऱ्यांचा जीव भांड्यात पडला.

कंपनीच्या विद्युत रूममध्ये साप असल्याची माहिती कर्मचाऱ्यांनी तातडीने पुनर्वसु संस्थेला कळवली. सर्पमित्र स्वप्नील साटम यांना कळताच ते आपले सहकारी प्रितम भुसाणे व अनिकेत गायकवाड यांना घेऊन त्वरित घटनास्थळी पोहचले. स्वप्नील यांनी पाहणी केल्या लक्षात आले की, भारतीय नाग असल्याचे आढळून आले. उच्चदाब विद्युत पॅनलच्या मागे असलेल्या रिकामी जागेत एका रबरी सुरक्षा मॅट खाली लपून बसला होता. सर्पमित्रांनी उच्चदाबाच्या विद्युत वाहिन्या असल्यामुळे सुरक्षेची काळजी घेत बचाव कार्य सुरू केले. अडचणीच्या ठिकाणी नाग असल्याने बचावकार्यात अडथळा निर्माण होत होता, मात्र सर्प मित्रांनी पकडण्याचा प्रयत्न करताच फणा काढून फुत्कार काढत असल्याने नाग अधिक धोकादायक भासत होता.

सर्पमित्रांनी चतुराईने नागाला पकडले. त्याची तपासणी केली. उपस्थित कर्मचाऱ्यांना सापाविषयी माहिती दिली. अनेकांच्या प्रश्नांना उत्तरे दिली. त्यांचे गैरसमज दूर केले. पुनर्वसु संस्थेचे अधिकारी व कामाचाऱ्यांनी कौतुक करून आभार मानले. त्यानंतर सदर सापाविषय वनविभागास माहिती देऊन सापाला सुखरूपरित्या जंगलात सोडण्यात आले.

# मुरूडचे शेतकरी दुबार शेतीपासून वंचित

## आंबोली धरणाच्या कालव्यांची कामे रखडली

**मुरूड : प्रतिनिधी**

प्रामुख्याने शेतीला पाणीपुरवठा करण्याच्या हेतूने उभारण्यात आलेल्या मुरूड तालुक्यातील आंबोली धरणाच्या दोन्ही कालव्यांची कामे गेल्या सात वर्षांपासून अर्धवट स्थितीत रखडली आहेत. त्यामुळे शेकडो शेतकरी दुबार शेतीपासून वंचित राहिले आहेत.

मुरूड तालुक्यातील पिण्याच्या पाण्याची समस्या कायमस्वरूपी मिटावी आणि शेतकऱ्यांना दुबार पीक घेता यावे, या उद्देशाने सुमारे २९ कोटी रुपये खर्च करून जलसिंचन विभागामार्फत आंबोली धरणाची निर्मिती करण्यात आली. त्यासाठी अनेक शेतकऱ्यांच्या जमिनीसुद्धा घेण्यात आल्या होत्या. सध्यस्थितीत या धरणातून मुरूडसह परिसरातील १२ गावांना पाणीपुरवठा होतो. मात्र डाव्या आणि उजव्या तीर कालव्यांची कामे रखडल्याने धरणातून शेतीला पाणीपुरवठा करण्याचा उद्देशाने सफल झालेला नाही.

आंबोली धरणाच्या पाण्यातून मुरूड तालुक्यातील तब्बल ६०० हेक्टर जमीन ओलिताखाली येणार होती. त्यासाठी धरणापासून डावा आणि उजवा असे दोन कालवे काढण्यात येणार होते. उजवा तीर कालवा १० किमी तर डावा कालवा २.६४ किमी लांबीचा आहे. मात्र सध्यस्थितीत उजव्या तीर कालव्याचे ६.१ किमी काम अपूर्ण आहे. तर डाव्या तीर कालव्याचे १.६४ किमी काम गेल्या सात वर्षांपासून रखडले आहे. त्यामुळे आंबोली धरणाचे पाणी शेतीपर्यंत पोचत नाही. परिणामी दुबार शेतीचा फायदा स्थानिक शेतकऱ्यांना मिळू शकलेला नाही.



(छाया : संजय करडे)

मुरूड तालुक्यात दरवर्षी सरासरी २८०० मिलिमीटर पाऊस पडतो. त्यामुळे आंबोली धरणात मुबलक पाणीसाठा होतो. मात्र कालव्यांची कामे अर्धवट स्थितीत असल्याने धरणातील पाणी शेतापर्यंत जात नाही. धरण बांधतेवेळी कालव्यांच्या कामाचा आराखडा तयार करण्यात आला होता. परंतु तो प्रत्यक्षात कार्यान्वित न झाल्याने कालव्यांची कामे गेल्या सात वर्षांपासून रखडली आहेत. आंबोली धरणाच्या डाव्या व उजव्या तीर कालव्यांची कामे पूर्ण झाल्यास दुबार भात पीक घेता येईल, शिवाय बागायती, दुग्ध व्यवसाय व कृषी पर्यटनाला चालना मिळेल. त्यातून शेतकऱ्यांचा आर्थिकस्तर उंचावेल. त्यामुळे आंबोली धरणाच्या दोन्ही कालव्यांची रखडलेली कामे जलद गतीने मार्गी लावावीत, अशी मागणी

**“ आंबोली धरणाच्या दोन्ही कालव्याच्या कामास सुधारित मान्यता आणि त्यानंतर कार्यादेश मिळेपर्यंत दोन वर्षांचा कालावधी लागण्याची शक्यता आहे. संपूर्ण प्रकल्प १२३ कोटींचा असून भूसंपादनासाठी १०० कोटींहून अधिक रकमेचे वाटप झाले आहे.**

**– एस. डी. जाधव,**
**कार्यकारी अभियंता,**
**पाटबंधारे विभाग–पेण**

## पेणमध्ये ईद-ए-मिलाद उत्साहात

**पेण : प्रतिनिधी**

इस्लामचे धमर्गुरु हजरत मोहम्मद पैगंबर यांचा जन्मदिवस रविवारी (दि. ९) पेण शहरात उत्साहात साजरा करण्यात आला. शहरातील खान मोहल्ला मुस्लिम समाज बांधवांच्या वतीने शनिवारी लहान मुलांचे नातं पठण, प्रवचन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. खान मोहल्ला मशिदीत प्रवचनाचा कार्यक्रम ठेवण्यात आला होता. तसेच कसाई मोहल्ला येथेही मुलांच्या नातं पठण कार्यक्रम झाला. या वेळी मुस्लिम मोहल्ल्यात आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली होती. खान मोहल्ला मुस्लिम समाज बांधवांतर्फे रविवारी पेण तालुक्यातील मुस्लिम समाज बांधव व महिलांसाठी स्नेहभोजन तसेच सायंकाळी ४.३० वाजता भव्य जुलूसचे आयोजन करण्यात आले होते. ही मिरवणूक खान मोहल्ला आझाद मोहल्ला, महावीर मार्ग, कसाई मोहल्ला, बाजारपेठ मार्गे पुन्हा खान मोहल्ल्यात आली. तिथे जुलुसची सांगता करण्यात आली. या मिरवणुकीत खान मोहल्ला, कसाई मोहल्ला, वडगाव, अंतोरे, वडखळ तसेच तालुक्यातील मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने सामील झाले होते. कसाई मोहल्ला येथे मिरवणुकीतील लोकांनां सरबत व प्रसादाचे वाटप करण्यात आले. या वेळी फैयाज इनामदार व लियाकत मुजावर यांनी उपस्थित समाज बांधव व पोलीस अधिकाऱ्यांचे आभार मानले. मौलाना यांच्या कुराणातील आयात पठाणाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.



(छाया : अनिस मनियार)

## खोपोलीत कोजागरी पौर्णिमा उत्साहात



**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

कोकण मराठी साहित्य परिषद (कोमसाप) खोपोली शाखेच्या वतीने संस्थेच्या अध्यक्ष उज्वला दिघे यांच्या अध्यक्षतेखाली कोजागरी पौर्णिमा मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

कोजागिरी निमित्ताने उपस्थित सदस्यांनी कविता वाचन, विविध कलागुण दर्शन सादर केले. यात चंद्रासंबंधी कविता, संगीत संशयकल्लोळ नाटकातील अभिनय प्रवेश वाचन, जुने हिंदी गीत गायन, भावगीत गायन, उज्वला दिघे यांनी सादर केलेली लावणी व सवालजबाब यांनी कार्यक्रमात रंगत आणली. या कोजागरी पौर्णिमा सोहळ्यात खोपोली कोमसापचे कार्याध्यक्ष नरेंद्र हर्डिकर, कार्यवाह जयश्री पोळ, कोषाध्यक्ष वामनराव दिघे, जिल्हा बालविभाग प्रमुख प्रकाश राजोपाध्ये, सल्लागार नितीन भावे, माजी प्राचार्य कोरे, माजी अध्यक्षा रेखा कोरे, कोमसाप चौक शाखेचे अध्यक्ष यशवंत सपकाळ, सूर्यकांत सरोदे, सुरेश चव्हाण, कवी प्रकाश सोनवणे, कवयित्री जयमाला जांभळे, डॉ अस्मी सावरेकर, सुप्रिया मेहेंदळे इत्यादि सहभागी झाले होते.

## नेरळपाडा येथील रेल्वे फाटक उघडण्यास अजून दोन दिवस पाहावी लागणार वाट

**कर्जत : प्रतिनिधी**

मध्य रेल्वेच्या मेनलाईनवर असलेले नेरळपाडा फाटक रुळांच्या दुरुस्तीच्या कामानिमित्त ७ ऑक्टोबरपासून सहा दिवस पूर्णवेळ बंद राहणार, असे रेल्वे प्रशासनाकडून सांगण्यात आले होते. मात्र हे काम पूर्ण होण्यास अधिक कालावधी लागणार असल्याने फाटक सुरू होण्यासाठी अजून दोन दिवस वाट पाहावी लागणार आहे.मध्य रेल्वेच्या नेरळ स्थानकादरम्यान रुळांमध्ये काम केले जाणार आहे. नेरळ–कळंब या राज्य मार्गावरील नेरळपाडा फाटकाजवळ रेल्वे प्रशासनाकडून या कामाला सुरुवातही करण्यात आली आहे. या कामात अडथळा निर्माण होवू नये म्हणून हे फाटक ७ ते १२ ऑक्टोबर या सहा दिवसात बंद ठेवण्याचा निर्णय रेल्वे प्रशासनाने घेतला होता. परंतु या कालावधीत काम पूर्ण होणार नाही. त्यामुळे हे फाटक १४ ऑक्टोबरपर्यंत बंद राहणार आहे.



(छाया : विजय मांडे)

## साळाव येथे किशोरवयीन मुली, विद्यार्थ्यांचे समुपदेशन

**रेवदंडा : प्रतिनिधी**

राष्ट्रीय पोषण माह अंतर्गत मुरुड तालुक्यातील साळाव येथील प्राथमिक मराठी शाळेत किशोरवयीन मुलींसाठी पोषणमूल्ये व आरोग्य तर विद्यार्थ्यांसाठी समतोल आहार या विषयावर डॉ. अंकित काटकर यांनी मार्गदर्शन केले.

गटशिक्षणाधिकारी बी. के. पाखरे, केंद्रप्रमुख मोहिनी पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आलेल्या या कार्यक्रामाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक चंद्रकांत काटकर यांनी केले. निरोगी जीवनशैली टिकून ठेवण्यासाठी पौष्टिक, पूरक आणि संतुलित आहार महत्त्वाची भूमिका बजावते असे त्यांनी सांगितले.

आरोग्य सेविका शिल्पा ठाकूर यांनी मुलगी वयात येताना दिसून येणारे बदल, वयात येणाऱ्या मुलींनी कोणती काळजी घेतली पाहिजे, मुलींनी कोणत्या प्रकारचा आहार घेतला पाहिजे, याविषयी मार्गदर्शन केले. तर डॉ. अंकित काटकर यांनी समतोल आहाराचे महत्त्व, याबद्दल मुलांना मार्गदर्शन केले. समतोल आहारामुळे शारीरिक शक्ती, मानसिक तत्परता, बौद्धिक प्रगल्भता, रोग प्रतिकारशक्ती, सुदृढ व्यक्तिमत्व आणि आरोग्यपूर्ण दीर्घायुष्य मिळते, असे त्यांनी सांगितले.

सरपंच निलम पाटील, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षा मनिषा पाटील, सहशिक्षिका झेंडेकर, आरोग्य सेवक गणेश जैतू, माधुरी कांबळी यांच्यासह आशावर्कर, मातापालक आणि विद्यार्थी या कार्यक्रमाला उपस्थित होते. रेश्मा धुमाळ यांनी आभार मानले.



(छाया : महेंद्र खैरे)



**खोपोली : भाजपचे ज्येष्ठ नेते ॲड. राजेंद्र येरूणकर यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना शहर अध्यक्ष इंदरमल खंडेलवाल, उपाध्यक्ष दिलीप पवार, सरचिटणीस हेमंत नांदे, प्रमोद पिंगळे, कामगार आघाडीचे सूर्यकांत देशमुख, माजी शहराध्यक्ष विजय तेंडुलकर, युवा मोर्चा शहराध्यक्ष अजय इंगुलकर, माजी अध्यक्ष संजय कचरे, आप्पा पवार, देशमुख व इतर.**



**माणगाव : हिमाचल प्रदेश येथील स्पर्धेत मिस इंडिया ठरलेली प्रणाली खांबे हिचे गोरेगाव येथे अभिनंदन करताना भाजपचे तालुकाध्यक्ष संजयआप्पा ढवळे. सोबत ज्येष्ठ नेते नाना महाले, तालुका उपाध्यक्ष यशोधरा गोडबोले, युवा मोर्चा तालुका अध्यक्ष विशाल गलांडे आदी.**

## स्वराज्य संघटनेच्या शाखांचे पेणमध्ये उद्घाटन

**पेण : प्रतिनिधी**

स्वराज्य संघटनेच्या पेण तालुक्यातील विविध शाखांचे छत्रपती संभाजी राजे यांच्या हस्ते उद्घाटन रविवारी (दि. ९) करण्यात आले.

प्रथम हमरापूर येथील शाखेचे उद्घाटन झाले. यावेळी पंचक्रोशीतील नागरिक उपस्थित होते. पेण शहरात आल्यानंतर छत्रपती संभाजी राजे यांच्या हस्ते शिवस्मारकाचे पूजन झाले. त्यानंतर विविध संघटनांच्या वतीने राजांचे स्वागत करण्यात आले. या वेळी छत्रपती संभाजी राजे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. दुपारी मराठा समाज भवन येथे सभा संपन्न झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मंगेश दळवी यांनी केले. त्यानंतर आमदार रविशेठ पाटील, माजी आमदार धैर्यशील पाटील, विनोद साबळे यांची भाषणे झाली. होतकरू तरुण पुढे आले तर स्वराज्याचे सुराज्य करता येईल, असा विश्वास संभाजी राजे यांनी या वेळी वक्त केला.

त्यानंतर पेण तालुक्यातील गणपती वाडी, आंबेघर, धामणी, सावरसई, सापोली, हेटवणे, मांगरुळ, कामार्ली, कुरमुरली, नानेगाव, पाणेड, वरवणे, वाकरुळ, नाडे, गागोदे बुद्रुक, गागोदे खुर्द, वाशिवली, वरसई, आष्टे, निधवली, पाडले या गावात संभाजी राजे यांच्या हस्ते स्वराज्य संघटनेच्या शाखांचे उद्घाटन करण्यात आले.



(छाया : अनिस मनियार)

## स्मार्ट प्रकल्पामध्ये सहभागी होण्याचे शेतकरी उत्पादक कंपन्यांना आवाहन



**अलिबाग : जिमाका**

राज्य शासन शेतकरी उत्पादक कंपन्यांना जागतिक बँकेच्या माध्यमातून ६० टक्के अनुदान देत असून जास्तीत जास्त कंपन्यांनी स्मार्ट प्रकल्पामध्ये सहभागी होऊन योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन रायगड जिल्हा अंमलबजावणी कक्ष (स्मार्ट) प्रमुख तथा प्रकल्प संचालक आत्मा व जिल्हा कृषी अधीक्षक उज्वला बाणखेले यांनी अलिबाग येथे केले.

रायगड जिल्ह्यातील नोंदणीकृत शेतकरी उत्पादक कंपन्यांची व शेतकरी गटांची सभा नुकतीच अलिबाग येथे पार पडली. त्यात उज्वला बाणखेले उपस्थितांना मार्गदर्शन करीत होत्या. या वेळी बाणखेले यांनी शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या प्रतिनिधींना स्मार्ट योजनेचे महत्व पटवून सांगितले.

रायगड जिल्ह्यासाठी केवळ १५ शेतकरी उत्पादक कंपन्यांचा लक्षांक असल्यामुळे लवकरात लवकर प्रस्ताव प्राथमिक मंजूरीसाठी सादर करावेत व आवश्यक असणारी कागदपत्रे, शेतकरी उत्पादक कंपनीचे नोंदणी प्रमाणपत्र, लेखापरीक्षण अहवाल, सभासदांची यादी व खरेदीदारासोबतचा करार इत्यादी कागदपत्रे सादर करावित, असे आवाहन जिल्हा नोडल अधिकारी तथा आत्माचे प्रकल्प उपसंचालक सतिश बोऱ्हाडे यांनी केले.

स्मार्ट प्रकल्पाचे विभागीय नोडल अधिकारी रामेश्वर पाचे यांनी शेतकरी कंपन्यांना प्रस्ताव तयार करण्यामध्ये असलेल्या अडचणी जाणून घेतल्या. त्यामध्ये सभासद संख्या व वार्षिक उलाढाल या अटी शिथिल करण्यात याव्यात, अशी मागणी कंपनी प्रतिनिधींनी मांडली. याविषयी बोलताना जिल्हास्तरावरुन अटी व शर्ती शिथिल करण्याविषयी प्रस्ताव शासनास सादर करण्यात येईल, असे उज्वला बाणखेले यांनी सांगितले. दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन किंवा शेळीपालन यावर आधारित किंवा मत्स्यव्यवसाय आधारित प्रकल्प वगळता इतर जास्तीत दोन किंवा तीन धान्य पिके किंवा फळवर्गीय पिकांची मूल्यसाखळी विकसित करण्याच्या दृष्टीने प्रक्रियेसंदर्भातील किंवा ग्रेडींग पॅकिंग व विक्री किंवा ग्रेडींग पॅकिंग निर्यात संबंधीचे प्रस्ताव कंपन्यांनी सादर करावेत, असे मूल्य साखळी विकास तज्ज्ञ भाऊसाहेब गावडे यांनी सांगितले. या वेळी स्मार्ट प्रकल्पाविषयी अधिक माहितीसाठी ९३५९३९९३८३/९९६७८३८१०४ या क्रमांकावर संपर्क करण्याचे आवाहन कृषी विभागाकडून करण्यात आले. जिल्ह्यातील तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक आणि शेतकरी उत्पादक कंपन्यांचे प्रतिनिधी या सभेला मोठ्या संख्येने उपस्थित होते. सतिश बोऱ्हाडे यांनी आभार मानले.

# राष्ट्रीय वॉटर पोलो स्पर्धेत महाराष्ट्राचे दुहेरी यश

## रायगडच्या शिलेदारांची दमदार कामगिरी

**पाली : प्रतिनिधी**

महाराष्ट्र संघाने ३६व्या राष्ट्रीय वॉटरपोलो स्पर्धेत पुन्हा एकदा आपले वर्चस्व सिद्ध केले. यात रायगडच्या शिलेदारांनी दमदार कामगिरी केली आहे.

गुजरातमधील गांधीनगर येथे झालेल्या राष्ट्रीय वॉटरपोलो स्पर्धेत महिला संघाने प्रथम क्रमांक पटकाविला, तर पुरुषाच्या संघाने तृतीय क्रमांक मिळविला. रिलायन्स आयपीसीएल जलतरण तलावर अनेक वर्ष सराव करणारी कोमल रमेश किर्वे हिला महाराष्ट्राच्या महिला संघाचे नेतृत्व करण्याची संधी मिळाली. या संधीचे सहकारी खेळाडूंच्या साथीने अक्षरश: सोने करून तिने राज्याला सुवर्णपदक जिंकून दिले आहे. तिची सहकारी मानसी गावडे हिने अंतिम सामन्यात तीन गोल केले, तर आणखी एक खेळाडू राजश्री गोगले हिनेसुद्धा चमक दाखविली. या तिघींनी रिलायन्स क्लबचे नाव देशात गाजविले आहे.


(छाया : धम्मशील सावंत)

महाराष्ट्र पुरुष संघाचे नेतृत्व करणारा अक्षय जनार्दन कुंडे हासुद्धा रायगडमधील उत्तम खेळाडू असून तो दहा वर्षांपासून रेल्वे संघाचे नेतृत्व करून अनेकदा सुवर्णपदक जिंकण्यात यशस्वी ठरलेला आहे. त्याचा लहान भाऊ अश्विनीकुमार कुंडे, श्रेयस वैद्य व सारंग वैद्य हे बंधू तसेच गोलरक्षक मंदार भोईरनेही भरीव कामगिरी केली आहे. महिला व पुरुष संघातील खेळाडूंना आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक दत्ता तरे यांचे मार्गदर्शन लाभले.

नुकत्याच झालेल्या राष्ट्रीय वॉटरपोलो स्पर्धेत रायगड जिल्ह्यातून १० मुले व तीन मुलींनी भाग घेतला होता. त्यांनी रिलायन्स क्लबचे नाव गाजविले. याबद्दल रिलायन्स समूहाचे अध्यक्ष मुकेश अंबानी व त्यांचा परिवार तसेच रिलायन्स नागोठणे डिव्हिजनचे अध्यक्ष श्री. गोयल, अविनाश श्रीखंडे आदींनी या टीमचे अभिनंदन व कौतुक केले.

# बॉक्सिंग चॅम्पियनशिपमध्ये पनवेलच्या खेळाडूंची चमक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

येथील योगिनी पाटीलने मुंबईतील जोगेश्वरी येथे झालेल्या १८व्या ज्युनिअर मुलींच्या महाराष्ट्र राज्य बॉक्सिंग स्पर्धेत सुवर्णपदक पटकाविले. याशिवाय अन्य दोन खेळाडूंनी रौप्य व कांस्यपदकाच्या मानकरी ठरल्या.



योगिनी पाटीलने प्राथमिक फेरीत सातारा, उपांत्य फेरी पुणे जिल्हा आणि अंतिम फेरी औरंगाबाद शहरातील प्रतिस्पर्ध्यांचा पराभव करत सुवर्णपदक जिंकले. ती सुधागड एज्युकेशन सोसायटीची विद्यार्थिनी असून इयत्ता अकरावीत शिकते.

केईएस हायस्कूलची विद्यार्थिनी उन्नती परदेशी हिने याच चॅम्पियनशिपमध्ये कांस्यपदक, तर महाड येथील मानसी कांबळे हिने रौप्यपदक मिळविले.

योगिनीने अर्जुन पुरस्कारप्राप्त माजी ऑलिम्पियन बॉक्सर मनोज पिंगळे तसेच अद्वैत शेंबवणेकर यांच्या मार्गदर्शनाखाली बॉक्सिंगचे प्रशिक्षण घेतले आहे. गेल्या वर्षी ती राष्ट्रीय चॅम्पियनशिपमध्ये रौप्यपदक विजेती होती आणि औरंगाबाद येथील स्पोर्ट्स अथॉरिटी ऑफ इंडिया सेंटरमध्ये खेलो इंडिया योजनेंतर्गत पात्र ठरली होती. ऑक्टोबरच्या अखेरीस मणिपूरची राजधानी इंफाळ येथे होणाऱ्या ज्युनिअर राष्ट्रीय बॉक्सिंग चॅम्पियनशिपमध्ये महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करण्यासाठी योगिनी पाटीलची निवड झाली आहे. या यशाबद्दल तिन्ही खेळाडूंचे अभिनंदन होत असून योगिनीला पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

पनवेलसह रायगड जिल्ह्यातील खेळाडू विविध स्पर्धांमध्ये नेत्रदीपक कामगिरी बजावून पदके जिंकत असल्याचे पहावयास मिळत आहे.

# टीम इंडियाने दक्षिण आफ्रिकेविरुद्धची वनडे मालिकाही जिंकली

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारताने दक्षिण आफ्रिकेला धुळ चारत तिसऱ्या आणि निर्णायक सामन्यात मंगळवारी (दि. ११) दणदणीत विजय मिळवला. कुलदीप यादवच्या चार विकेट्सच्या जोरावर भारताने दक्षिण आफ्रिकेचा डाव फक्त ९९ धावांत आटोपला. या आव्हानाचा पाठलाग करताना भारताने दमदार फलंदाजी केली आणि हा सामना सात गडी राखत सहजपणे जिंकला. याआधी भारताने टी-२० मालिका २-१ने जिंकली होती.

दक्षिण आफ्रिकेचे १०० धावांचे आव्हान माफक वाटत होते, पण या धावांचा पाठलाग करण्यासाठी उतरलेल्या भारतीय संघाची सुरुवात चांगली झाली नाही. कर्णधार शिखर धवन पुन्हा एकदा अपयशी ठरला व ८ धावांवर धावबाद झाला. मागील सामन्यात आक्रमक ९३ धावांची खेळी केलेल्या इशान किशनला फॉर्चुनने १० धावांवर बाद केले. त्यानंतर मागील सामन्याचा शतकवीर श्रेयस अय्यर व सलामीवीर शुबमन गिल यांची जोडी जमली. त्यांनी ३९ धावांची भागीदारी करीत भारतीय संघाला विजयाच्या दिशेने नेले. गिलने



### विश्वविक्रमाशी केली बरोबरी

या सामन्यात भारताने विजय मिळवून एका वर्षात सर्वाधिक आंतरराष्ट्रीय सामने जिंकण्याच्या ऑस्ट्रेलियाच्या १९ वर्षांपूर्वीच्या विक्रमाशी बरोबरी केली आहे. भारताने या वर्षात ३७ सामने जिंकले आहेत. ऑस्ट्रेलियानेही अशीच कामगिरी केली आहे. भारताकडून कुलदीप यादवने ४.१ षटकात १८ धावा देत सर्वाधिक चार विकेट घेतल्या, तर वॉशिंग्टन सुंदर, मोहम्मद सिराज आणि शाहबाज नदिमने प्रत्येकी दोन विकेट घेत कुलदीपला चांगली साथ दिली.

४९, तर अय्यरने २८ धावा केल्या.

तत्पूर्वी भारताचा कर्णधार शिखर धवनने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. वॉशिंग्टन सुंदरने तिसऱ्या षटकात क्विंटन डी कॉकला बाद करून आफ्रिकेला पहिला धक्का दिला. त्यानंतर एकापाठोपाठ एक आफ्रिकेचे फलंदाज बाद होत गेले. त्यांच्या फक्त तिघा फलंदाजांना दुहेरी धावसंख्या करता आली. ६६ धावांवर त्यांचा निम्मा संघ बाद झाला होता. कुलदीप यादवच्या धमाकेदार कामगिरीच्या जोरावर भारताने तिसऱ्या आणि अखेरच्या वनडे सामन्यात दक्षिण आफ्रिकेला फक्त ९९ धावांवर ऑलआउट केले. त्याने चार बळी टिपले.

भारतासाठी सर्वच गोलंदाजांनी उत्कृष्ट गोलंदाजी केली. वॉशिंग्टन सुंदर व सिराज यांनी सुरुवातीचे चार गडी बाद करूण आफ्रिकेला बॅकफूटवर ढकलले, तर भारताचे दोन्ही फिरकीपटू कुलदीप यादव आणि नवखा शाहबाज अहमद यांनी मिळून दक्षिण आफ्रिकेचा निम्मा संघ बाद केला. त्यांनी आफ्रिकेच्या फलंदाजांना अक्षरशः नाकीनऊ आणले होते. ही त्याच्या एकदिवसीय कारकिर्दीतील सर्वोत्तम कामगिरी ठरली.

# चेतेश्वर पुजारा नवीन संघासोबत खेळणार

**राजकोट : वृत्तसंस्था**

इंग्लंड कौंटी क्रिकेटकडून खेळताना चेतेश्वर पूजाराने आपल्या कारकिर्दीत नवीन भरारी घेतली आहे. कौंटी संघ ससेक्ससाठी खेळताना त्याने कसोटी आणि एकदिवसीय सामन्यांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करून दाखवली आहे. त्यानंतर तो अलीकडेच भारताच्या देशांतर्गत इराणी चषकमध्ये सौराष्ट्राचे प्रतिनिधित्व करताना दिसला. आता पुजारा नव्या संघात येण्यासाठी सज्ज झाला आहे. खुद्द त्यानेच याचा खुलासा केला आहे.

भारतीय संघाचा अनुभवी फलंदाज चेतेश्वर पुजाराने स्वतःचा एक फोटो सोशल मीडियावर शेअर केला आहे. हा फोटो शेअर करताना त्याने सांगितले आहे की, तो लवकरच एका नवीन संघासाठी खेळताना दिसणार आहे, मात्र तो कोणत्या संघाकडून खेळणार याबाबत त्याने अद्याप खुलासा केलेला नाही. हा फोटो शेअर करीत ३४ वर्षीय भारतीय फलंदाजाने त्याच्या कॅप्शनमध्ये लिहिले की, 'ही नवीन इनिंग सुरू करताना खूप छान वाटत आहे! तुम्ही माझ्या नवीन संघाच्या नावाचा अंदाज लावू शकता का?



अधिक माहितीसाठी संपर्कात रहा!'

पुजाराच्या या ट्विटवर त्याचे चाहतेही कमेंट करून आपले विचार मांडत आहेत. पुजारा एका नव्या जाहिरातीत दिसणार असल्याचे अनेक चाहत्यांना वाटते. त्याचवेळी सय्यद मुश्ताक अली ट्रॉफीमध्ये तो सौराष्ट्र संघाकडून खेळू शकेल, अशी आशाही काही चाहत्यांनी व्यक्त केली आहे.

### इनडोअर क्रिकेट विश्वचषक

# भारताचा यूएईवर विजय

**सिडनी : वृत्तसंस्था**

जागतिक इनडोअर क्रिकेट महासंघाने (डब्ल्यूआयसीएफ) ऑस्ट्रेलियात आयोजित केलेल्या इनडोर क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत भारताने यूएईवर १७ धावांनी पराभव करून विजय मिळवला. या सामन्यात भारताने फलंदाजी करताना १६ षटकांत ११३ धावा केल्या होता, तर यूएईने ९६ धावा करताना जोरदार लढत दिली.

१६ षटकांच्या सामन्यात भारताच्या चारही जोड्यांनी अनुक्रमे ३१, १७, ३६ व २९ धावा करत एकूण ११३ धावा करीत मजबूत स्थिति मिळवली, तर भारतीय गोलंदाजांनी यूएईच्या चारही जोड्यांना अनुक्रमे २३, ३८, २१ व १४ धावांवर रोखले. भारताच्या गोलंदाजांनी १६ षटकांत यूएईचे एकूण पाच फलंदाजांना बाद केल्याने यूएईच्या धावाफलकतून २५ धावा कमी करता आल्या, तर यूएईच्या गोलंदाजांनीही १६ षटकांत भारताचे एकूण पाच फलंदाजांना बाद केल्याने भारताच्या धावाफलकतूनसुध्दा २५ धावा कमी करता आल्या.


### राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा

# मल्लखांबमध्ये महाराष्ट्राची 'सुवर्ण' घोडदौड कायम

**अहमदाबाद : वृत्तसंस्था**

राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्राची मल्लखांब प्रकारात घोडदौड सुरूच असून आणखी तीन सुवर्णपदकांची भर पडली आहे. त्यामुळे सोमवारी महाराष्ट्राने पदकतालिकेत दुसऱ्या स्थानावर झेप घेतली.

मल्लखांब प्रकारात शुभंकर खवले, अक्षय तरळ व रूपाली गंगावणे यांची कामगिरी महाराष्ट्राच्या यशात निर्णायक ठरली. शुभंकर या पुण्याच्या खेळाडूने पुरलेल्या मल्लखांबावर लवचिकतेचे अप्रतिम प्रदर्शन केले. दोरीच्या मल्लखांबावर अक्षय सरस ठरला. महिला विभागातील दोरीच्या मल्लखांब प्रकारात रूपाली गंगावणेने



अपेक्षेप्रमाणे सुवर्णपदक पटकाविले. पुरलेल्या मल्लखांबावर मात्र तिला कांस्यपदकावर समाधान मानावे लागले. दोरीच्या मल्लखांबावर नेहा क्षीरसागर कांस्यपदकाची मानकरी ठरली. जान्हवी जाधवने रौप्यपदक जिंकले.

बॉक्सिंग प्रकारात निखिल दुबेने ७५ किलो आणि रेनॉल्ड जोसेफने ९२ किलो गटात उपांत्य फेरी गाठताना किमान कांस्यपदक निश्चित केले. उपांत्यपूर्व फेरीतील एकतर्फी लढतीत निखिलने दिल्लीच्या बंटी सिंगचा पराभव केला. रेनॉल्डने ९२ किलो गटात राजस्थानच्या वरूण शर्माचा पराभव करताना पंचांकडून ४-१ असा कौल मिळविला.

वुशू प्रकारात ओमकार पवार व संकेत पाटील या खेळाडूंना उपांत्य फेरीतील पराभवामुळे कांस्यपदकावर समाधान मानावे लागले. ओमकारला जम्मू काश्मीरच्या अभिषेक जामवालने ७-७, ८-९ असे पराभूत केले. संकेतला सेनादलाच्या विकी रॉयकडून २-१२, ३-१४ अशा फरकाने पराभव पत्करावा लागला.

# बीसीसीआयला मिळणार नवीन अध्यक्ष?

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट नियामक मंडळ अर्थात बीसीसीआयला आता नवीन अध्यक्ष मिळणार आहे. विद्यमान अध्यक्ष असलेला भारताचा माजी कर्णधार सौरव गांगुली यांच्या टर्मचे आता काही तासच शिल्लक राहिले आहेत. लवकरच बीसीसीआयच्या सर्व पदांसाठी पुन्हा निवडणूक होणार आहे, मात्र गांगुली पुन्हा या अध्यक्षपदाचा दावेदार नसेल अशी माहिती समोर येत आहे. अशात बीसीसीआयचा नवीन अध्यक्ष कोण असेल याबाबत अनेक तर्कवितर्क लढवले जात असताना एकाचे नाव निश्चित झाले आहे.

माजी वेगवान गोलंदाज रॉजर बिन्नी, जे १९८३च्या विश्वचषक विजेत्या संघाचा महत्त्वाचा भाग होते ते सौरव गांगुलीच्या जागी बीसीसीआयचे अध्यक्ष होऊ शकतात. एएनआयच्या वृत्तानुसार, सचिव जय शाह त्यांच्या पदावर कायम राहणार आहेत. यासाठी दोन नावे पुढे येत असताना एका रिपोर्ट्सनुसार, भारताचे माजी क्रिकेटपटू आणि विश्वचषक विजेते रॉजर बिन्नी हे बीसीसीआयचे अध्यक्ष होऊ शकतात. बिन्नी हे सध्या कर्नाटक क्रिकेट असोसिएशनमध्ये आहेत तसेच ते बीसीसीआयच्या निवड समितीचेही सदस्य राहिले आहेत.

बीसीसीआय अध्यक्ष सौरव गांगुली पुन्हा अध्यक्ष बनण्याच्या मूडमध्ये नाहीये तसेच सचिव जय शाहदेखील अध्यक्ष बनण्याच्या शर्यतीत नाहीयेत, मात्र ते सचिवपदासाठी पुन्हा अर्ज करीत आहेत, तर अरुण धुमाळ यांच्या जागी भाजपचे मुंबई अध्यक्ष आमदार आशिष शेलार खजिनदार होण्याची शक्यता आहे.







दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com